प्रकरण तिसरे

# कुंजविहारींच्या कवितेचे अंतरंग



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# प्रकरण ३ रे

## कुंजविहारींच्या कवितेचे अंतरंग

प्रस्तावना

अ) काव्यातील विविध प्रमुख आशयसूत्रे

१) राष्ट्रभक्ती हीच प्रमुख प्रेरणा

२) मातृभूमीचे प्रेम

३) पारतंत्र्याची चीड

४) आत्माहुती

५) क्रांतीचा जयजयकार

६) विभूतीपूजन

 १) आधुनिक वीर आणि विभूती

 २) पौराणिक वीर विभूती

७) सामाजिक कविता

८) लोकशाहीचे आदर्श चित्र

९) गोंधळगीत, भूपाळी, आरती, स्तवन, प्रार्थना इ.लोकगीते

१०) शृंगारिक काव्य

 ब) वाङ्मयविषयक कविता

 क) अध्यात्मविषयक कविता

  १) भावगीते

  २) अध्यात्मिक गीते

 ड) अनुवादित कविता.

समारोप

संदर्भ सूची

१) **प्रस्तावना -**

कुंजविहारींच्या 'गीतगुंजारव' व 'आहुती' या काव्यसंग्रहातील कवितांचा अभ्यास करणार आहोत. गीतगुंजारव इ.स.१९२६ ला प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहात ५० कविता आहेत. 'आहुती' हा १९७२ ला प्रकाशित झाला. यातील कवितांची संख्या ६७ अहे. 'गीतगुंजारव' व 'आहुती' या काव्यसंग्रहातील एकूण कविता ११७ आहेत. दोन्ही संग्रहातील समान कविता ३४ आहेत. यातही २७ ची शीर्षक समान आहेत. तर ७ कवितांची शीर्षकं बदलली आहेत. उरलेल्या कविता या गीतगुंजारवमधील १६ आहेत तर आहुतीमधील ३३ कविता आहेत. एकूण ४९ कविता समान नसलेल्या आहेत. म्हणजे ४९+३४=८३ या कवितांचाच अभ्यास करावयाचा आहे.

या संपूर्ण कवितांमध्ये वेगवेगळ्या विषयांचाही आपल्याला अभ्यास करावयाचा आहे. असे असले तरी या कवितांचा मूळ गाभा राष्ट्रीय व अध्यात्म हाच आहे. यातूनही सूक्ष्म निरीक्षण केले असता ठळकपणे चार विभाग पडलेले दिसून येतात. राष्ट्रीय कविता, वाङ्.मयविषयक कविता, आध्यात्मिक कविता, अनुवादित कविता. राष्ट्रीय कवितेमध्ये अनेक राष्ट्रीय भावनेच्या छटा दिसून येतात व या विभागात येणाऱ्या कविताही संख्येने जास्त आहेत. त्यांचा स्थायीभाव राष्ट्रीयतेचाच असल्याने दिसून येते. त्याचे पुढील उदाहरण ; -

दिनांक ९-१२-१९५६ रोजी कुंजविहारींच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली तेव्हा सत्कारप्रसंगी भाषण केले तेव्हा त्यांनी माखनलाल चतुर्वेदी यांच्या 'पुष्पकी अभिलाषा' या कवितेतल्या ओळी सांगितल्या.

'मुझे तोड लेना वनमाळी
उस पथ पर तुम देना फेक
मातृभूमिपर शीस चढाने

जिस पथपर जावे वीर अनेक'

या फुलाप्रमाणे आपली गती होऊन आपले जीवन सार्थकी लागावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. यावरून त्यांच्या अंगात राष्ट्रीय भावना किती खोल रूजली होती हे दिसून येते. म्हणूनच कुंजविहारींना राष्ट्रीय कवी म्हणतात.

**अ) काव्यातील विविध प्रमुख आशयसूत्रे -**

**१) राष्ट्रभक्ती हीच प्रमुख प्रेरणा -**

कुंजविहारी यांच्या बालमनावर लोकमान्यांच्या विचारांचा ठसा उमटला होता. व नंतर गांधीयुगाचा ठसा उमटला. पारतंत्र्यामुळे सर्व जनता होरपळून निघत होती. कवीने गिरणी कामगारावरील अत्याचार जवळून पाहिले होते. कुंजविहारींकडे असलेली मूळची राष्ट्रीय वृत्ती या वातावरणामुळे उफाळून आली. त्यांच्या मनावर परंपरेचा पगडा होता. अनेक पौराणिक, ऐतिहासिक पुरूषांचा संस्कार त्यांच्या मनावर झाला होता. या सर्व भावनिक रसायनातून एक अंकुर बाहेर आला आणि तो म्हणजे 'राष्ट्राचा सेवक' राष्ट्रांचा सेवक होण्यासाठी स्वार्थ त्याग, स्वतःला स्वराज्याच्या अग्निकुंडात झोकून देण्याची वृत्ती असावी लागते.

या सर्वांची तयारी करूनच कुंजविहारींनी स्वतःच्या ज्गण्याचे ध्येय निश्चित केले. ते 'माझे ध्येय' कवितेत ध्येयाविषयी सांगतात. "ध्येय निश्चित करण्याला कारणही आहे. राष्ट्रभक्ती परंपरेने चालत आली आहे. आर्यभूमी ईश्वराची लाडकी आहे. संकटात प्रभू नक्कीच तिचा सांभाळ करतो. राम-कृष्ण यांनी आर्यभूचा सांभाळ केला. यवनाच्या काळामध्ये शिवराय, रामदास अवतरले तर इंग्रजांच्या काळात लोकमान्य, गांधीजो हे राष्ट्राचे सेवक आले आहेत. आर्यभूमीतील सर्वजण आपले बांधव आहोत, जर कोणी या भूमीत बाहेरून येईल त्यास परतवून लावू हाच आता माझा धर्म आहे."

"हा धर्मचि माझा ठरला

की सेवक मी राष्ट्राचा...

... हा स्वार्थधूप जाळून

ओवाळूनि पंचप्राण' आ.पृ.३

हा धर्म कुंजविहारींनी शेवटपर्यंत पाळला. कवीची राष्ट्रभक्ती ही सुरूवातीला क्रांतीच्या मार्गाची होती. नंतर तिच्यामध्ये अहिंसावादी, सत्याग्रही वृत्ती निर्माण झाली. ते त्यांनी 'महात्मा गांधी गीत' या कवितेमध्ये सांगितले आहे. सत्याग्रहाचा आग्रह करताना कवी म्हणतात -

"भारतीय नरनारी विनवी जोडूनिया कर

स्वदेशी व्रत घ्या हो करा देशाचा उध्दार

सोडवा शीघ्र आम्हा तुम्ही होऊनी स्वतंत्र

स्वावलंबन स्वाभिमान हाच स्वातंत्र्याचा मंत्र" गीत पृ.९३

असे बोलून गांधी तुरूंगात गेले. कवी सांगतात की, या घटनेमुळे भारत सावध झाला आहे. तो क्रांती करेल. स्वतंत्रतेचे हे कार्य महात्मा गांधींच्या रूपाने पूर्ण करूया. राष्ट्रधर्म निभावण्यासाठी कवी भारतीयांना आवाहन करतो आहे -

"पितापुत्रनाथ बंधु रत राष्ट्रकार्यी सारी

हातभार लावू त्यांना आम्ही कुलवती नारी

व्रताने उदयापन तीच स्वातंत्र्याची खूण

महात्मा गांधी-हाती पूर्ण करो हा भगवान" गीत पृ.९३

भारतभूमीचा उध्दार करण्यासाठी प्राणाची खैरात करा असे 'तरूण भारत' या कवितेत कवी सांगतात. कारण भारत बंदिवान आहे. म्हणून उपहासाने सारे विश्व हसत आहे. मातृभूमी केविलवाणे हंबरडे फोडते आहे. तिला सगळीकडे कसाई दिसतात. भारतीय

कार्यपराङ्.मुख बनले म्हणून आपलाच दाम खोटा दुसऱ्याला दोष देण्यात काय अर्थ ? लंबीचौडी भाषणे द्यायची आणि ती संपल्यानंतर थंड बसून रहायचे म्हणून कवी म्हणतात- "तडफदार तरूणविन न दिसे आर्यभूमीचा कोणी वाली।" आपण आर्यांनी पराक्रम केला हे किती दिवस ऐकायचे ते आता इतिहास जमा
झाले, म्हणूनच 'परकी कीटक' धुडगूस घालत आहे. म्हणून तरूणांनो तुम्ही उठा उदयाचा काळ उज्ज्वल आहे. तुम्ही आजच्या इतिहासात तुमचं नाव सोनेरी अक्षराने लिहा. तरूणांनो तुम्ही नव्या दमाचे शूरवीर आहात. उठा तरूणांनो कारण -

"सुशील सदगुणि तरूणांवरती इतिहासाचे फिदामन
स्वार्थ नको परमार्थ न ठावा निज राष्ट्राची करू सेवा
आत्मोन्नतिचा देशहिताचा मार्ग सुखाचा बहु बरवा।।" आ.पृ.२२

हेच योग्य आहे कारण आम्ही अमर होणार आहोत. आम्हाला काळाचे भय नाही. आम्ही मरणाचा जन्मापूर्वीच करारनामा केला आहे. आम्ही देवाजीचे लाडके आहोत. मृत्यू हा तर तरूणांचा खेळ आहे. कवी म्हणतात -

"देशासाठी मरू दहादा करू शेवटी कुरघोडी
कसल्याही संकटा न भिऊ नित सुजन संमत भाग धरू. आ.पृ.२२-२३
राष्ट्रकार्यि तन-मन-धन अर्पूनि अजरामर सत्कीर्ति वरू।"

अशाप्रकारे कुंजविहारींनी राष्ट्रभक्तीने स्वतःला वाहून घेतले आहे व तरूणांनीही तोच मार्ग अवलंबावा असे सांगतात. सर्वकाही म्हणजे भारत आहे. या भारतभूमीचा उध्दार करण्यासाठी प्राणांची खैरात करण्यास सांगतात.

स्वतःबरोबर इतरांचाही उध्दार करण्यासाठी एका पौराणिक घटनेचा 'सावित्रीगीत' या कवितेत कुंजविहारींनी सांगितले आहे. उध्दार करण्यासाठी निष्ठा, नितांत निष्ठा असावी लागते. मग अशक्यही शक्य होते. सती सावित्रीप्रमाणेच प्रत्येक

भारतीयांची राष्ट्रनिष्ठा असावयाला पाहिजे तरच भारतभूमीला सौभाग्य लाभेल कवी सावित्रीविषयी म्हणतात.

"सहचारिणी सहधर्मचारिणी-उभयकुलोध्दारिणी...

...भारतभूमिला भूषण बनली श्री सावित्री सती" आ.पृ.३७

या कवितेत स्वकार्यावर निष्ठा, मातृभूमी बद्दलचे प्रेम, राष्ट्रभक्ती असावी असे सूचितही केले आहे.

कुंजविहारींनी राष्ट्रभक्ती स्वातंत्र्यपूर्व काळात जशी आहे तशीच स्वातंत्र्योत्तर काळातही ती कायम आहे. तरूणांच्या, राष्ट्रभक्तांमुळेच स्वातंत्र्य मिळाले त्यामुळे चैतन्य सर्वत्र पसरले आहे. अशी भावना 'धन्य आजचे तरूण' या कवितेत सांगितली आहे. -

राष्ट्रभक्तिचे बळे घेतला परवशतेचा बळी

एकशाहिने लोकशाहिला शरण पत्रिका दिली. आ.पृ.७१

म्हणून आपण आजचा आनंद आपण बघू शकतो परंतु एवढ्यावर थांबायचे नाही कारण-

सुवर्णभूमी नाव परी ना कणा सोन्याचा दिसे

सुजला सुफला सश्य शामला गीत मानशी रूसे. आ.पृ.७१

अशी स्थिती आहे. परंतू ही स्थिती सुध्दा नक्की जाईल. सोने खाण्यापेक्षा लोखंडाचे चणे खाऊ स्वातंत्र्याचा आनंद ब्रम्हपदासारखा आहे. पारतंत्र्य गेले ते आत्मजागृतीने, जनजागृतीने भूक, दुष्काळ, गरिबी यावर मात करू यासाठी - "श्रम कर्माचा धडा शिकविते ती जन्मापासूनी" ही वृत्ती धरू. याच तपातून समृध्दी प्रगटेल यासाठी सर्व साधनांचा उपयोग करून सर्व भारतीय समर्थ होतील तेव्हा हा कर्दनकाळ सुध्दा नष्ट होईल. तसेच भारताला एकमेवव्दितीय प्रगतिशील राष्ट्र बनवायचे असेल तर पूर्वीच्याच

पुण्यप्रेरणा भारतीयांनी अवलंबायला हव्यात असे 'पुण्यपावन प्रेरणा' या कवितेत कुंजविहारी सांगतात. पुण्यप्रेरणा भारतीयांनी अवलंबायला हव्यात, प्रभूकृपा असायला हवी ती निर्भयतेसाठी करून हिंसा पृथ्वीवर आहे. त्यासाठी पुन्हा अहिंसेचा मार्ग अवलंबण्याची प्रेरणा दे. चिदवृत्ती येण्यासाठी जागृती दे सत्य वचनाचा आग्रह करणाऱ्यांना शेवटी मरणच का? ही हिंसा टाळण्यासाठी ज्ञान दे की, ज्यामुळे सर्वांना जीवन दर्शन घडेल कल्याण करण्यासाठी शरमाचा मार्ग अंधळा ठरतो म्हणून कवी एकच मागणी मागतात.

"एकत्र या सन्मित्र व्हा" सहजीवनाची घोषणा

तव पुरातन नित्यनूतन पुण्यपावन प्रेरणा" आ.पृ.७५

हे सांगणे केवळ राष्ट्रनिष्ठा, भक्ती, राष्ट्राला पुढे नेण्याच्या वृत्तीमुळेच शक्य आहे.

स्वातंत्र्य मिळाले, लोकशाही आली परंतु खरी लोकशाही तळागाळातल्या प्रत्येक माणसा पर्यंत जावून पोहचली का? नाही. स्वार्थी लोकांनीच तिचा फायदा घेतला बाकी तसेच वंचित राहिले. म्हणून पुन्हा कवी 'नव तरूणास' या कवितेत म्हणतात -

"तळ हाती शिर, शिरी राज्यश्री, तरूण म्हणावे तया

रणसंग्रामी शब्दार्थांचे अवडंबर कासया" आ.पृ.८६

तिथे शिवसंकल्प राष्ट्रकारणी प्राण लाविता पणा हाच भाव असायला हवा स्वतंत्र भारतातली सद्यस्थिती सांगतात -

"परवशतेचा पाश नुरे परि मुक्त न शापातुनी...

...उध्दाराचा मार्ग रोधिला स्वार्थाधानी इथे

कुरूक्षेत्र हे नवे निर्मिले धृतराष्ट्राच्या सुते।" आ.पृ.८६

समुद्रमंथन करता कुणाच्या वाट्याला अमृत तर कुणाच्या वाट्याला विष आले परंतु

हे सर्व जुने झाले. नवे असे की लोकशाहीत विष ज्याच्या वाट्याला आले त्याच्या विषाचे अमृत करायला हवे. शिव बलवंत होते म्हणून विष पचले. आपण दुर्बल आहोत यामुळे सर्वांना अमृतच मिळाले पाहिजे. त्यासाठी - "सत्याग्रह संग्राम धर्म जगि गणि न मृत्यूच्या भया." हाच धर्म आजही आचरायला हवा. भारतीयांच्या मध्ये राष्ट्रवादाची बीजे रामराज्याने निर्मिली आहेत. रामाप्रमाणेच सर्व लोकांमध्ये राष्ट्रभक्ती असावी असे 'रामराज्य' या कवितेत कवी सांगतात, तोच वसा राष्ट्रकर्त्यांनी घ्यायला हवा. सर्वांनी लोककल्याणाची भावना ठेवावी.

"रामराज्य होते म्हणती येथे कुण्या काळी
येथे दुःख नव्हते झाली भूमि भाग्यशाली
लोकराज्य-कल्याणाची भावना अखंड
एक राज्य संसाराची कल्पना प्रचंड" आ.पृ.१०२

व्यापक, मानवतावादी राष्ट्रवादानेच हे सर्व शक्य होवू शकते. या लोककल्याणकारी राष्ट्रात कुणीही दुःखी, गरीब, दैन्य घेवून राहत नाही. असे उदाहरण रामाने आम्हा भारतीयांना घालून दिले आहे. संग्राम सुध्दा कशासाठी हवा तर -

"नित्य नव्या संग्रामांतहि ध्यास शांततेचा
आत्मयज्ञ आदी-अंती भाग्यतिलक भाळी।" आ.पृ.१०३

ही वृत्ती ठेवावी. तसेच कवींनी सर्व भारतीयांना अखेर एक राष्ट्राच्या आनंदी भवितव्याविषयी एक कानमंत्रही सांगितला आहे. तो सर्व भारतीयांनी शिरसावदय मानायला हवा.

"जन्मभूमि श्रीरामाची जाहली स्वतंत्र
जन्मदात्रि निज पुत्रातें देई कानमंत्र
नविन भव्य संसाराचे राज्ययंत्र

नको नरकी आतां म्हणुनि शपथ घाली"    आ.पृ.१०३

'रत्नागिरी परिषद' या कवितेत महाराष्ट्राचा व महाराष्ट्राच्या थोर सुपुत्रांचा अभिमान व्यक्त केला आहे. हे व्यक्त होणे हे राष्ट्रभक्तीचेच दयोतक आहे. कवी म्हणतात-

"राष्ट्र माऊली भारतभूमी आम्ही तिचे कुमर
मर्दुमकीचा महाराष्ट्र हा जगांत महशूर
गणिमी कावा वेष बावळा देश डोंगराळ
स्वतंत्रतेचे साधन शिकवी श्री शिवभूपाल" आ.पृ.२४

कवी असहकार, प्रतियोगी सरकार या सर्वांचा उल्लेख केला आहे. एवढी मोठी चळवळ करणे आहे असे कवीला वाटते म्हणून ते म्हणतात -

"बड्या बड्यांच्या भांडणात मज घालु नको देवा
घडो ऐपतीवरी काहीतरि राष्ट्राची सेवा"    आ.पृ.२५

या ओळीतून सामान्यांची राष्ट्रभक्तीही दिसून येते.

कुंजविहारींची राष्ट्रभक्ती सुरूवातीपासून अखेरपर्यंत होती. अशी राष्ट्रनिष्ठा आपल्याकडेही आहे का? याचे आत्मनिरीक्षण करायला लावते? व हे आत्मनिरीक्षण वाचकांना राष्ट्रभक्तीकडे उदयुक्त करते. हे मात्र नक्की !

**२) मातृभूमीचे प्रेम -**

सर्व जगामध्ये हिंदुस्थानचे प्राकृतिक सौंदर्य निराळे आहे. म्हणूनच सर्वांना ते लोभसवाणे वाटते. मग येथील सुपुत्रांना तिचा लळा लागणार नाही असे होणारच नाही. कुंजविहारी तर देशभक्त, राष्ट्रभक्त त्यांना या मातृभूमीची ओढ अतोनात आहे. ही ओढ, भक्ती त्यांनी काही कवितातून व्यक्त केली आहे.

साने गुरूजींच्या अतीव मातृप्रेमाचे उदात्तीकरण देशभक्तीत झाले. तसेच

कुंजविहारींच्या मातृभूमी प्रेमाचे रूपांतर राष्ट्रभक्तीत झाले असावे. ते प्रेम त्यांच्या 'नमो मायभूमी' या कवितेतून दिसून येते. कवी निसर्गदृश्यात विहार करत आहेत. या निसर्गातूनच ते आपल्या मातृभूमीच्या परदास्याच्या बेड्या लवकर जातील अशी भक्ती व्यक्त करतात. पूर्व दिशेला गुलाबी छटा दिसते. ते स्वातंत्र्य लवकरच मिळणार हेच सांगते. या सांकेतिक दृश्याला त्रिवार नमन. मातृभूमीच्या प्रेमाच्या चाहत्यांनी पूजन केले. त्या भक्तीच्या सुगंधाने सर्व वातावरण प्रफुल्लित झाले आहे. सूर्याचे छोटे रूप तारका, याही तिमिर नष्ट करणाऱ्या आहेत. पण त्या तुझ्या येण्याने गायब झाल्या असे सर्वांना वाटते. परंतु नाही, त्यातर सुंदर फुलांच्या रूपाने सर्वांना प्रेरणा देण्यासाठी सज्ज आहेत. इथली पाखरे तुझ्या स्वतंत्रतेची गीते गातात. तर नदी स्वतंत्रतेचे दिव्य गाणेच सर्वांना सांगते आहे. एकूणच काय तर हा सर्व निसर्गच तुझ्या स्वतंत्रतेची द्वाही सर्वत्र पसरवत आहेत. म्हणून इथल्या भूमीला, निसर्गाला कवी म्हणतो-

'अम्हा देव तू धर्म तू मायभूमी
अम्हा स्फूर्ति तू कीर्ति तू मायभूमी
...तेजोराशि सहोदर दिनकरा सांभाळ भूदेविला
झाली दीन कशी सदा बघशि की सर्वत्र तू चांगला
हासे पूर्ण दिशा सुहास्य गगणी शोभे प्रकाशापरी
ऐसे हास्य विभो कधी बाहीन मी या हिंदभूमीवरी" आ.पृ.४

कुंजविहारी निसर्गातून मातृभूमीचे प्रेम व्यक्त करत असता त्या प्रेमाला पौराणिकतेचाही आधार देतात. हे 'श्री सत्यविनायक' या कवितेतून दिसून येते. पार्वतीने गणपतीला निर्माण केले म्हणून गणपतीने मातेचे वचन पाळले-

"वचन तियेचे प्रतिपाळावे हा माझा छंद
तिनेच केला स्वाधिन माझ्या प्रदेश हा सारा



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

परकी प्राण्या, येसी तैसा जारे माघारा"     आ.पृ.२०

भारतभूमीनेही आपल्याला तिच्या अंगाखांद्यावर वाढवले. आपणही गणपतीप्रमाणे मातृभक्त बनूया. मातृप्रेमासाठी सत्याचा आग्रह धरून पित्याबरोबर युध्द केले. मग आपण सुध्दा मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राण गेले तरी बेहत्तर परंतु आत्मोध्दारासाठी लढायला तयार होवूया कारण,- 'भारतभूमी परवशतेने झाली बेजार' ही वेदना पाहवत नाही. त्यासाठी तिचे रक्षण करून आपण आपला आत्मोध्दार करूया.

'भेटेन नऊ महिन्यांनी' ही त्यांची सर्वात गाजलेली कविता. हे मातृभूमीचे प्रेम, देशभक्ती यांचा उत्कट अविष्कार या कवितेतून झाला आहे. फासावर जाणाऱ्या स्वातंत्र्यवीराचे हे मनोगत आहे.

मातृभूमीचे प्रेम त्यांचे ठायी इतके अफाट आहे की, आता जरी मरणार आहे. तरी माझी एवढी अफाट इच्छाशक्ती आहे की, पुन्हा मी नऊ महिन्यांनी भारतभूमीवर मातेच्या पोटी जन्म घेईनच. आईला हा क्रांतिकारक 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेत फाशीवर जाताना हा देशभक्त आईला भेटीचा दिवस सांगतो आहे कारण -

"अन्नपाणि सेवुनि जिथले
हे शरीर म्यां पोशियले
परदास्यि देश तो लोळे"     आ.पृ.२८
स्वातंत्र्य मला मिळेल कोठोनी । भेटेन नऊ महिन्यांनी."

पकडणाऱ्या शिपायांना तो दोष देत नाही. फासाला तो भीत नाही. त्याच्यासारखा तोच सर्वश्रेष्ठ आहे. फासावर जाताना परक्याला लाथ हानूण जाई. आई, बघ मी तुझ या सेवेला मुकेन. आई-मुलाच्या भेटीचा हा क्षण कठीण आहे. तो आईला म्हणतो -

"लाभते जया वीर-मरण भाग्याचे। वैकुंठपदी तो नाचे
दे जन्म मला मातृभूमिचे पोटी। पुन्हा पुन्हा मरण्यासाठी

मागेण हेच श्रीहरिला

मातृभूमि उध्दारण्याला

स्वातंत्र्यरणी लढण्याला" आ.पृ.३०

मातृभक्तीमुळे जे व्हायचे ते झाले. हिमगिरीला सागर भेटतो त्याप्रमाणे त्याचे मरण होते पण त्याचे प्रेम इतर मातृभूमीच्या प्रेमिकांना स्फूरण देऊन गेला.

मातृभूमीचे रूप म्हणजे आई. 'चिमणा शूर शिपाई' या कवितेत आई मुलाला मातृप्रेम, गोरस व पान्हा प्रदान करते. मातेला वाटते तिचा बाळ खेळताना अपराध करतो म्हणून त्याला उपदेश करावा, रागे भरावे पण त्याची गरज नाही.

"निति-निपुण मन पवित्र वर्तन वागे व जागे अपुले

अनुकरणाला उपदेशाहुनि उदाहरण चांगले" गीत पृ.४३

याचे उदाहरण म्हणजे तुकाराम, समर्थ, शिवाजी आहेत. कोण जाणे? हाच चिमणा पुढे भारत मातेचा शूर शिपाई होईल.

वरील कवितेत जसे देशभक्तापुढे उदाहरण आहे तसेच भारताचे प्राकृतिक सौंदर्यसुध्दा वीरांना प्रेरणा देत आहे ते 'वंदेमातरम' या कवितेत. श्री. आ.

"जेथे पानफुलांसमान फुलती स्वातंत्र्यवीरागृणी

जेथे प्राण तृणासमान सध्दर्म संरक्षणी

सत्याचा अभिमान वागवि सदा पाषाणही जेथला

माते ! मी लपवून मानमुजरा प्रेमे तुला वाहिला" आ.पृ.३४

मातृभक्तीसाठी सहज उत्कट अशी ओढ बालकास असावी लागते. म्हणजेच मातृभूमीवरचे प्रेम व्यक्त करण्यासाठी मृत्यूचे चुंबन घ्यावे लागले तरी बेहत्तर, ती भक्ती असावी लागते हेच कवीने 'ओवाळणी' या कवितेतून सूचक भावनेने व्यक्त केले आहे. या कवितेत मधूमामा आईला सोन्याच्या बांगड्या ओवळणीत देतात.

बाळाला ही वाटते मलाही मधूमामासारखे ओवाळावे. आई बाळाला ओवाळते व म्हणते आता तू काय ओवाळणी घालणार? ते कावरे बावरे उभे राहते, त्याला काहीतरी सूचते व पटकन आईचा गोड पापा घेतो. हीच ती ओवाळणी. या गोड प्रेमा व्यतिरिक्त आईला काय हवे असते?

प्राकृतिक सौंदर्याने भारतभूला नटविले आहे. तसेच तिच्या शूरवीरांनीही तिला गौरवशिखरा वर नेले आहे. म्हणूनच प्राचीन युगापासून ती पुण्यपावन अशी भूमी बनली आहे. 'पुण्यपावन प्रेरणा' या कवितेत कवी म्हणतात. ज्या पुण्य-पावन घटना आहेत त्या आजही भारतवीरांना प्रेरणा देतील. कवी म्हणतात-

"धन्य तू प्रिय भारतभूमी वदय जन-गण जीवना

तव पुरातन नित्य नूतन पुण्यपावन प्रेरणा" आ.पृ.७५

ज्या ज्या वेळेस असूर आले, परकीय आले तेव्हा तेव्हा प्रभूकृपा होते आणि इथले वीर निजधर्म आचरतात तो आचरताना मरण आले तरी स्वीकारतात हीच नित्य नूतन प्रेरणा आहे. कुंजविहारींनी त्याच्या या वरील कवितेतून मातृभूमिविषयीचे प्रेम व्यक्त केले आहे की, ज्यामुळे अनेक वीर त्यातून प्रेरणा घेतील. अर्थात या भारतीय वीरांकडे ती जाण आहे. फक्त जाण येणे महत्वाचे. मातृभूमीच्या प्रेमाची तोडच नाही. असे हे प्रेम 'भेटेन नऊ महिन्यांनी','ओवाळणी','श्री सत्यविनायक','नमो मायभूमी','पुण्यपावन प्रेरणा' या कवितेतून दिसून येते.

**३) पारतंत्र्याची चीड -**

मातृभूमीच्या उत्कट प्रेमामुळेच कुंजविहारींना भारतभूची परवशता असह्य करते व ती असाह्यता त्यांच्या काव्यात येते. पारतंत्र्याची चीड पानोपानी व्यक्त करतात. या चीडीतूनच भारतीयांना कवी आपल्या काव्यातून स्वातंत्र्याचा संदेश देतात, प्रेरणा

देतात.

'भारतास' या कवितेत कवी उज्ज्वलशाली भारताच्या संपन्न, ज्ञानी, वीरांच्या भूमीचे वर्णन करत आहेत. या वैभवाला दृष्ट लागली.

"शौर्य, धैर्य, धन विद्याही । प्रारब्ध नष्टचि झाली

स्वतंत्र जयाचे गेले

ते जिवंत असुनी मेले

की प्रेतचि ते सजलेले" आ.पृ.५

म्हणूनच कुंजविहारींना पारतंत्र्याची चीड येते. पूर्वजांनी शत्रूवर मात केली. त्यांना मृत्यूसुध्दा भीत होता. भारतीयांना नरवीराचा छावा म्हणतात. सद्य परिस्थितीत रडव्या गीतांनी कार्यभाग होणार नाही. त्यासाठी कृतिप्रणवताच पाहिजे. यातून नक्कीच यश येईल. असा आशावादही कवीने प्रगट केला आहे.

पारतंत्र्याची चीड 'मागासलेल्यास' या कवितेमध्ये उत्तम प्रकारे रेखाटली आहे. प्रथम कवी म्हणतात- 'नसे पारतंत्र्याविना निदय काही' अशी मागासलेपणाची जाण देतात. भारतीयांच्या गंजलेल्या वृत्तीवर नेमके बोट ठेवतात. मागासलेल्या स्थितीवर मात करू इच्छितात.

"असोनी हरी भावितो श्वान मी का

असोनी धनी तस्कराला नमी की

असोनी हिरा त्यास हिनत्व आले

म्हणावे तुम्हा कवि...मागासलेले।" गीत पृ.३६

जिथे स्वाभिमान तिथेच स्वबद्दल, स्वदेशाबद्दल प्रेम आणि जिथे प्रेम तिथेच स्वदेशहित जपण्यांची तळमळ. ही तळमळ या कवितेतून दिसते आहे. कुणी भारताला हिन लेखलेले कवीला आवडत नाही, ते म्हणतात -

"कुणी लेखिती तुच्छ या भारताते

वयाला कुणी बोलती दुर्वचाते

मनी झोंबती शब्द ते जेवि भाळे" गीत पृ.३६

कुंजविहारींना परदास्य श्रृंखलेचे ओझे असह्य करते आहे. आणि म्हणून कवींनी ईश्वरालाच संध्यासमयी स्वतंत्रेची प्रार्थना केली आहे. ती 'संध्या' कवितेत. कोणतेही इप्सित साध्य करण्यासाठी शुध्दभाव असावा लागतो. हे सर्व असून हे पारतंत्र्याचे अघटित कसे घडले. आर्यभूमीचा उध्दार करण्याचे कसे तू ईश्वरा विसरला. कवी ईश्वराला मानतात, त्याच्यावर व त्याच्या वचनावर विश्वास आहे. भारतातील सर्व धन बाहेर जाते ते सर्व थांबव.

"त्रिविक्रमा कधि माझ्या मनिचे पुरवशील कोड?

आर्यभूमिची परदास्याची बेडी ही तोड।" गीत पृ.५

हे महाविष्णू तुला वारंवार विनंती करतो आहे तूच यातून सोडवशील हाच एक ध्यास आहे.

"पडे आर्यभू बनुनि भिकारी परक्यांच्या दारी।

उगीच वाटे येईल आता माझा हृषिकेश

केविलवाणी भारतभूमी घेत तुझा ध्यास।" गीत पृ.५

हा ध्यास घेऊनही ईश्वर अद्याप आला नाही ही "बार्शीच्या भगवंतास" या कवितेमध्ये रात्रीचा दिवस करून भगवानापाशी मागणे मागण्यास कवी आलेत ते भगवंताला म्हणतात - "तुझे रूप पाहून आनंद वाटला, शांत वाटले. पण इकडे भारतीय अन्नपाण्याविन तडफडत असता तुला श्रीमंतीचे सोंग कसे आठवते? असे असले तरी माझ्यात, ईश्वरात, आर्यभूमीत काळा रंग साम्य आहे. म्हणून तू काव्याचा कैवार घे"



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOL...

"मानहानि ही पुरे लाभु दे मानाचे मरणे

परवशतेचे जिणे जिवाला वाटे लाजिरवाणे" आ.पृ.१७

बरे असू दे तोपर्यंत आम्हीच देवाजीचे देणे म्हणून यशासाठी भांडतो यासाठी तुझी कृपा असू दे भगवंत !

'गझनफर' साप्ताहिकातील पहिली कविता 'अर्जी' आहे. हे साप्ताहिक स्वदेशी चळवळीला वाहिलेले होते. ईश्वराला इतके आळवूनही - "भारत के संतान मरने लगे।इन्साफके मुर्दे गिरने लगे" अशी बिकट अवस्था भारतीयांची झाली आहे. आ.पृ.११८ भारतीयांना ब्रिटीश साम्राज्यवादासाठी युध्दामध्ये वापर करून घेते परंतु यातून आम्हाला काय फायदा? आम्ही गुलाम ते गुलामच राहिलो-

"गुलामीमे मजहब मिलेगा कहाँ।अंधेरेसे सुरज रहेगा कहाँ

ये गझनफर अब तो भेडे बने।नही आदमी हम मकोडे बने"

एवढेच नाहीतर इथले लोक पै ला महाग झाले आहे कवी म्हणतात-

"धोकर खडा हूँ मै आसूसे हात।निकलती है जलके कलीजेसे बात

गुलामीका धब्बा धुलादे नबी।न तो हिंदवाले कतलकर सभी"

आ.पृ.११८

अस जरी असले तरी ईश्वरावर विश्वास आहे. आम्ही हिंदू मुस्लिम मिळून ही गुलामी घालवू फक्त आशीर्वाद दे !

'नव्या जगाच्या निर्मात्यांनो' या कवितेत स्वतंत्रतेची चाहूल लागली आहे. म्हणून ते नव निर्मात्यांनो तुम्ही आजचे शिवाजी रामकृष्ण आहात हे स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने लोकांचे असेल पण हा मार्ग सुखाने मिळणार नाही.

"पराभवाच्या माथां हाणीत लाथ सारखे पुढे सरा

बंदीवान जन, बंदीवान मन, बंदीवान बल बुध्दि बने" आ.पृ.५४

पराभवाची चीड इतकी आहे की, पारतंत्र्याला लाथा मारल्याशिवाय गत्यंतर नाही, तरच स्वातंत्र्य मिळेल.

स्वातंत्र्यपूर्व ही चीड साहजिक आहेच. परंतू स्वातंत्र्योत्तरही ही चीड आहे. त्यासाठी 'बंडखोर स्फूर्ति' ची गरज आहे. बंडखोर स्फूर्ती कशासाठी तर असंतोषासाठी. जीवन क्रांतीसाठी. नकळत शत्रूत्वाची सूरी इथे रोवली आहे. म्हणून कवी म्हणतात-

"शत्रूमित्र हा भेद नसो जगि धर्माचे सांगणे

धर्मानेही पाप मानले परवशतेचे जिने।" आ.पृ.७९

जनजागृती, आत्माहुती, आत्मशक्ती सर्वामुळेच स्वातंत्र्य मिळाले. हे सर्व आठवले की मन शंकित होते परंतु हे व्रत पाळण्याची शक्ती दे.

वरीलप्रमाणे नव राष्ट्र निर्माण करण्यासाठी ही पारतंत्र्याची चीड उपयुक्त ठरते. ती 'नव तरूणांस' या कवितेत पहावयास मिळते. कारण-

"परवशतेचा पाश नुरे परि मुक्त न शापातुनी

उध्दाराचा मार्ग रोधिला स्वार्थांधांनी इथे

कुरूक्षेत्र हे नवे निर्मिले धृतराष्ट्राच्या सुते" आ.पृ.८६

स्वजगहित, सत्कर्म, सतधर्म यासाठी ही लढाई आहे.

"जित्या जिवांतुनि निर्मूलन कधि होतिल दुर्वासना

तोवरि हा संग्राम भूवरी, सौख्य न मुळी सज्जना" आ.पृ.८६

परकीय सत्तेला घालविण्यासाठी पारतंत्र्याची चीड स्वातंत्र्यपूर्व काळात होती. तर नंतर सुराज्य यावे यासाठीही दृष्ट प्रवृत्ती विरूध्द ही चीड होतीच पण तिची किनार थोडी सौम्य झाली होती.

### ४) आत्माहुती -

एखाद्या कार्यासाठी ते स्वतःला इतके वाहून घेते की, त्यामध्ये आपल्या स्वचा विचारच करायचा नाही. या आत्म आहुतीला अग्निकुंडात समर्पित केलेल्या समिधाचेच रूप येते. अशी वृत्ती असायला हवी.

स्वातंत्र्यपूर्व काळात अनेकांनी समरकुंडात स्वतःच्या संसाराची राखरांगोळी करून उड्या घेतल्या यांमुळे स्वातंत्र्य मिळाले याविषयी क्रांतीच्या राष्ट्रभक्तीच्या कवितेतून ती भावना पहायला मिळते. अशीच भावना 'बंडखोर स्फूर्ति' या कवितेत दिसते. पारतंत्र्यात अनेकांनी बलिदान केले म्हणूनच-

"आत्मशक्तीचे राष्ट्रभक्तीचे पुढेच पाऊल सदा" आ.पृ.८०

नव राष्ट्र निर्माणासाठीही आत्माहुती श्रेष्ठ ठरते.

परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आत्माहुतीची गरज आहे. खऱ्या अर्थाने अजून स्वातंत्र्य कुठे मिळाले आहे. सोन्याला स्वतःचा शंभर नंबरी कस दाखविण्यासाठी अग्नी परीक्षा घ्यावी लागत्ते. तसेच स्वातंत्र्य, लोकशाही जर यशस्वी व्हायची असेल तर आत्मसमर्पणाची भूमिका असायला हवी ही भावना 'होळी' या कवितेत प्रकर्षाने दिसते.

"स्वभावसुंदर हवे नवे जग शिवदेवाला जिवा
आत्म समर्पणे नव दैवी गुण वरिशिल तू केधवा" आ.पृ.७६

यातूनच आनंदाची गुढी उभारणार आहे.

### ५) क्रांतीचा जयजयकार -

जशी परिस्थिती तसेच शस्त्र असावयास पाहिजे नाहीतर परिणाम शून्य होतो. ब्रिटीशांनी भारतामध्ये साम्राज्यवादाचे पाय एवढे रोवले होते की, ते सहजासहजी

निघणार नव्हते यासाठी अनेक क्रांतिकारांनी, राष्ट्रपुरूषांनी, तत्ववेत्यांनी, साहित्यिकांनी साम्राज्य खिळखिळे केले. प्रत्यक्ष चळवळीत भाग घेवून किंवा त्या चळवळीला प्रोत्साहन देवून. कुंजविहारींनीही प्रखर साहित्य लिहून, राष्ट्रीय कविता लिहून हातभार लावला.

कुंजविहारींच्या काव्यातून क्रांतीचा जयजयकार पहावयास मिळतो. 'सवाल' या कवितेत कवी म्हणतात.

"स्वातंत्र्याची नौका जाते रक्तनदीतुनि पैल तिरी
सर्व जगाच्या इतिहासाची एक वाक्यता असे पुरी
रक्त समुद्री बुडी मारूनी स्वराज्य मौक्तिक बहु वेळ
मिळवू आम्ही शौर्य खेळुनि पानबुड्यांचा हा खेळ" आ.पृ.१६

असे कुंजविहारी स्पष्टच का म्हणतात तर स्वतंत्र हा शब्द उच्चारला तरी ब्रिटीश तुरूंग दाखवितात. अनेक नव्या कायद्याने अन्याय केला जातो, कुणी हत्यार बाळगले तर शिक्षा होते. इंग्रज लोक समतेचा डांगोरा पिटतात ते केवळ पोकळ आहे. ब्रिटीश केवळ मातृभूमीचा अपमान करतात म्हणून ते आर्यपुत्रांनो क्रांतीसाठी 'सज्ज हो' हे सर्व पटले म्हणूनच कवी म्हणतात.

"मोल अमोलिक देऊनि भारत स्वराज्य घ्याया अजिसज्ला"

आ.पृ.१६

परवशता असह्य झाल्याने क्रांतिकारकांची क्रांतीची भावना शिगेला पोहचली. क्रांती हेच आत्मोधाराचे साधन बनले 'भेटेन नऊ महिन्यांनी' मध्ये कवी मरणाला भीत नाही अशी मरणे लाभण्यासाठी वारंवार या मातृभूमीवर जन्म घेण्यासाठी तयार आहे ते म्हणतात-

"या देहाची करू कशाला चिंता

होईल ते होवो आता।"                आ.पृ.२९

क्रांतिकारकांना फास दिल्याने त्यातून अनेक क्रांतिकारक जन्माला आले. इतिहासात आपण बघतो संभाजीच्या मृत्यूने अनेक क्रांतिकारक मराठी सत्तेत उदयाला आले.त्यामुळे औरंगजेबाला दिल्ली तख्त सोडून २६ वर्षे मराठी सत्तेबरोबर झुंजावे लागले. अशीच क्रांतीची ज्योत क्रांतिकारक पेटवित असतात. या कवितेतील तरूणही मरणाला भीत नाही तो पुन्हा पुन्हा मातृभूमीसाठी जन्मणार आहे.

"परमेश्वराला सांग जाऊनी मावळत्या सूर्या

आर्य जनापरि स्वतंत्र व्हाया धडपडतो दर्या

...मर्दुमकीचा महाराष्ट्र हा जगांत महशूर

गणिमी कावा वेषें बावळा, देश डोंगराळ

स्वतंत्रतेचे साधन शिकवी श्री शिवभूपाल" अशी अनेक क्रांतिकारकांची यादी देऊन क्रांती करायला सांगितले आहे.

असाच क्रांतीचा विचार 'तरूण भारतास' या कवितेत व्यक्त केला आहे. ब्रिटीश साम्राज्य उलथविण्यासाठी भारतातील तरूणांनी सज्ज व्हायला पाहिजे. क्रांतीला सळसळते रक्तच हवे असते. तोच परिस्थितीवर स्वार होऊ शकतो. इतके दिवस तरूण वर्ग कर्तव्य पराङ्.मुख बनला आता वेळ आली ती क्रांतीची. भविष्यकालीन इतिहासाची सुबक अक्षरे लिहण्याची वेळ आली आहे. आर्यभूमीचे तरूण असे आहेत की,-

"अमरपुरीचे रहिवासी आम्हि काळाचे भय कोणाला

जन्मापूर्वीच आम्हि मरणाचा करारनामा करूनि दिला

देवाजीचे आम्ही लाडके मृत्यू आमुचा खेळगडी

देशासाठी मरू दहादा करू शेवटी कुरघोडी"      आ.पृ.२२

असे मृत्यूलाही खेळविणारा हा महामय ब्रिटीशांविरूध्द उभा राहणार आहे. 'रत्नागिरी परिषद' यात राष्ट्र तपस्वी राष्ट्राचे मूक मनोरथ सांगत आहे.

महाभारतातील कृष्णाने गीता सांगितली नंतर अर्जुन लढायला सिध्द झाला. तसेच इथे हा कृष्ण-कुंजविहारी १९ व्या शतकातील आहेत. ते तरूण भारतीयांना 'निसर्ग गीता' सांगत आहेत. रात्र व दिवस यांच्यात युध्द चालले आहे. मेघश्याम साक्षी आहे. तो व्यापक आहे. शाश्वत आहे. हे युध्द शांतीसाठी आहे आणि शांती मिळविण्यासाठी युध्द आवश्यक आहे.

"धर्मरक्षण

करि रणयज्ञा

समर सुजाणा

शांती हवी तर युध्द करी । ना तरि रौख नरक वरी ।"      आ.पृ.४४

असा संदेश देतात. या सर्वांचे ज्ञान होणे म्हणजेच विश्वरूपदर्शन होय. या ज्ञानाचे ज्ञान गीता दाही दिशाला पसरवत आहे. आता आनंदी आनंद होणार. हा आशावादही दिसतो.

स्वातंत्र्याच्या अगोदर सन.१८५७ ला स्वातंत्र्य समर पेटले होते. परंतु जहरी ब्रिटीशांमुळे ते राखेखाली शांत स्थितीत पडले. त्या सूत्र विस्तवाचा वणवा करायला हवा. त्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही. कवी 'सन.१८५७' या कवितेत म्हणतात-

नव्हे इंग्रजी राज्य हे बीज जहरी

न देऊं रूजू हिंदभूमीमधी

त्वेषे अशा जे स्वदेशार्थ-युध्दी

पणा लावुनी प्राण घेती उडी.      गीत पृ.८५

असे ध्येयवादी शिपाईगडीच बंड करू शकतात ते योग्यच आहे. कारण-

"रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले?

पुसे स्वर्गिच्या पूर्वजांची कथा

रणानेहि उरे वंशजांची व्यथा" गीत पृ.८५

वरील ओळीत शेवटी थोडी निराशा आली तरी ते अपयश लक्षात घेऊनच शत्रूच्या मर्मस्थलाचा भेद करून स्वातंत्र्य मिळवायचे आहे असे सूचित करतात.

कवीने 'निसर्गगीता' सांगितली आता या पार्थाला 'सारथी' होऊन मार्ग दाखविण्यास सांगितले आहे, ते 'मुजरा' या कवितेमध्ये. या कवितेत संताना, रणश्रीमंताना, माधवाला आशीर्वाद द्यायला सांगितले आहे.

तसेच लोकगंगे तू वीरवृत्तीला फुले वाहीन असे जर झाले तर स्वातंत्र्याचा भाग्योदय आहे. मानवता येणार आहे. म्हणूनच आपण शांतीमय ध्वज उभारू म्हणून हे माधवा-

"सारथि तू देवा । माधवा

भारतिया स्वातंत्र्यरणांगणे दाखवि पथ बरवा। माधवा ।" आ.पृ.४८

अशी क्रांतीची भावना या कवितेत ओथंबलेली दिसते.

'टाक पुढे पाऊल' या कवितेत कवी पुढेच पाऊल टाकायला सांगतात ते म्हणतात -

"नित्यनवा संग्राम भूवरी तू तर सेनापती

टाक पुढे पाऊल कशाची सुखदुःखाची क्षिती।" आ.पृ.५३

क्रांती करण्यासाठी फक्त आत्मविश्वास हवा -

"शौर्य, धैर्य, औदार्य मंत्रमय ध्वज उभरावा रणी

पुरे आत्मविश्वास एकला सैनिक संरक्षणी।" आ.पृ.५३

मग कुणाची सोबत नसली तरी चालेल यासाठी इतिहासातील उदाहरणे देतात.

"तो ध्रूव, तो प्रल्हाद एकला अभिमन्यू एकला
झुंज झुंजुनी शिरी मिरवती अमर कीर्तिचा टिळा
सिंहगडावर नर्रसिंहाने लढुनि मिळविले यशा।" आ.पृ.५३

एकटा आहे म्हणून भिती बाळगू नको कारण तू सत्याचा अग्रही आहेस.

"काळोखाची भिति कुणा ज्या सूर्य न ठावा कधी
सूर्योदय होताच प्रगटतिल किरणे लक्षावधी" आ.पृ.५९

तुझ्या क्रांतीचे अनेकजण अनुकरण करतील व तुला प्रतिनिधी मानून पुजतील.

भारतभूमीचे जयगीत गाण्यासाठी काय करायला हवे ते 'जयहिंद' कवितेत सांगतात-

"अग्निज्वाले माजी हासत विहरावे
मस्तकि शस्त्रांस्त्रांचे घावहि झेलावे
पवित्र संगरतीर्थी पावन व्हावे" आ.पृ.५६

क्रांतीचे असे रूप आहे. असा संदेश तरूणांना नेताजींनी दिला आहे. ते एक दृष्टे नेते होते. म्हणूनच मरेन अथवा मारेन अशीच वृत्ती असायला हवी असे सांगतात. साहसाने गगनाशी स्पर्धा करता येते.

"मरेन अथवा मारेन कृतनिश्चय ज्याचा
श्रीहरि अंतरसाक्षी सहकारी त्याचा" आ.पृ.५६

असा ज्वलंत आदर्श क्रांतिप्रिय तरूणांचा आहे.

स्वातंत्र्य मिळाले तरीही या क्रांतीची आठवण कुंजविहारींना होते. 'बंडखोर स्फूर्ति' या कवितेत क्रांतीची आठवण होते. सन.१८५७ चा शतायुषी दिवस १९५७ मध्ये साजरा केला तेव्हा कवींना त्या क्रांतिकारी कालखंडाची आठवण झाली. या

जीवन क्रांतीने सांगितले-

"शत्रू मित्र हा भेद नसो जगि धर्माचे सांगणे

धर्मानेही पाप मानले परवशतेचे जिणे" आ.पृ.७९

लोकांच्या मनात क्रांतिकारी भावना असल्याने त्यांनी अशी क्रांती केली की-

"सुखे घेतले तळहाती शिर निर्भय सत्ररांगणी

जळत्या खाइत उडी घातली तेजस्वीत्या जनी" आ.पृ.८०

या भारतीयांनी स्वतःला स्वातंत्र्य समरात झोकून दिले म्हणूनच-

"त्या रक्ताच्या त्या अश्रूच्या जागृत निष्ठेमुळे

विश्वप्रयत्ना राजकारणा आली अमृत फळे" आ.पृ.८०

असे असले तरी स्वातंत्र्य मिळूनही किती दिवस झाले तरी तेच जिणे लोकांच्या नशिबी आहे. 'नव तरूणास' या कवितेत कवी म्हणतात-

'परवशतेचा नांश नुरे परि मुक्त न शापांतुनी"

तोपर्यंत हा रणसंग्राम राहणार आहे. म्हणून 'तरूण भारतासमोर सुयश दे देवा मृत्यूंजया

रणसंग्रामी शब्दार्थीचे अवडंबर कासया"

नवीन कुरूक्षेत्र स्वार्थांधांनी निर्मिले आहे. हे नव तरूणांनी ओळखले पाहिजे व सत्याग्रहाचा आग्रह धरून ही जीवनक्रांती अशी चालू ठेवायला पाहिजे.

क्रांतीचा जयजयकार स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्योत्तरही केला आहे. क्रांती हाच गीतेने सांगितल्याप्रमणे धर्म आहे. हा धर्म नव्या युगातल्या 'कुंजविहारींनी' दाखवून दिला आहे.

**६) विभूती पूजन -**

राष्ट्रनिर्माणाकरिता अनेक राष्ट्रनेत्यांनी स्वतःचे तन-मन-धन राष्ट्राला अर्पिलेले



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KO

असते. या वीरांच्या, विभूतीच्या संबंधी कुंजविहारींचा पूज्यभाव होता. या वीरांपासूनच प्रेरणा घेऊनच ते स्वतः स्वातंत्र्यलढ्यात उतरले होते. छत्रपती शिवाजी महाराज, तानाजी, बाजी ही तर त्यांची दैवते. वीर विभूतिपूजनाच्या कविताही लोकप्रिय झालेल्या आहेत. 'मराठा गडी यशाचा धनी' हे शीर्षक असलेला कार्यक्रम आकाशवाणी पुणे केंद्रावरून दर मंगळवारी होत असे. हे उदाहरण लोकप्रियतेची साक्ष देते. यामध्ये दोन गट पडतात- (१) आधुनिक वीर आणि विभूती

**(२) पौराणिक वीर विभूती.**

**(१) आधुनिक वीर आणि विभूती -**

कुंजविहारीच्या विचारांवर टिळकांच्या विचारांचा पगडा होता. त्याचेच द्योतक म्हणून त्यांनी 'बाल टिळक' ही कविता लिहली. या कवितेत एक बाळ आईला टिळकांची गोष्ट सांगण्याचा हट्ट करते. तेंव्हा त्या बाळाचे बाबच ती कथा सांगतात- जिथे वेद सांगितले, जिथे प्रल्हाद, हनुमान, भीष्म, हरिश्चंद्र, कृष्ण आदी महान व्यक्ती जन्मल्या. आमच्या देशाच्या सीमा ब्रह्मदेश, सिंध, श्रीरामाचा सेतू, कैलास आहे तर महाराष्ट्रात श्री शिवराय, रामदास, पुंडलिकाच्या भक्तीने धावून येणारा विठ्ठल याच भूमितले. हे सर्व इतिहास जमा झाले. आजच्या काळात इ.स.१८५६ साली रत्नागिरी येथे बाल गंगाधर टिळक जन्माला आले. टिळकांना 'स्वतंत्रता' हा राष्ट्राचा प्राण वाटे म्हणूनच त्यांनी-

"स्वतंत्रतेचा महामंत्र मग कथिला विश्वास
स्वराज्य आहे जन्मसिध्द मम हक्क मिळणार
चैतन्याची ज्योत पेटवी 'केसरी' जनतेत ।" गीत पृ.८९

म्हणून त्यांना शिक्षा झाली. मंडालेच्या तुरूंगात त्यांनी 'गीतारहस्य' ग्रंथ लिहला पुढे कवी म्हणतात-

"तेथून सुटला फिरूनी उठला देश जागवील

स्वतंत्रता ही ज्याची त्याने स्वतः मिळवावी

गुरूजन म्हणती केवळ आम्ही वाट दाखवावी" गीत पृ.८९

आणि १ ऑगस्ट १९२० ला लीला संपविली तेच कवी म्हणतात-

"देह जगाचा होता, जगत ठेवियला

टिळक आमुचा बाप दयाळू देवाघर गेला।" गीत पृ.९०

कुंजविहारींच्या मनावर आणखी एका व्यक्तीचा पगडा होता. तो म्हणजे महात्मा गांधी. महात्मा गांधी या कवितेत आग्रहाने म्हणतात. स्वदेश घ्यावे तरीच गांधी गीत गावे । पुढे गांधींच्या कार्याविषयी म्हणतात-

"न्यायमुर्ति रानड्यांचा आणि त्या दोन गोपाळांचे

उंचावला अशोध्वज जगी गांधीरूपे साचा" गीत पृ.९२

त्यामुळे गांधीजी वनमाळीच वाटतात. ते तुरूंगात जाताना म्हणतात-

"स्वदेशी व्रत घ्या हो करा देशाचा उध्दार

स्वावलंबन, स्वाभिमान हाच स्वातंत्र्याचा तंत्र।" गीत पृ.९३

यासाठी सर्वजण या व्रताला हातभार लावतो आहे. कारण-

"व्रताचे उदयापन तीच स्वातंत्र्याची खण

महात्मा गांधी हाती पूर्ण करो हा भगवान।" गीत पृ.९३

कुंजविहारीचे दैवत श्री.शिवाजी महाराज यांच्याविषयी 'सुदिन' या कवितेत कवी म्हणतात-

या महाराष्ट्र नृसिंहाला गुलामगिरी विषारी जखम वाढली म्हणून हाती शीर घेऊन राजे लढले.

"शूर दिलाच्या वीर वृत्तिच्या तरूणांची वेळी
शिवाजी जमवित भवताली
दडी धरूनि बेधडक शत्रूवर चालुनिया जाती" आ.पृ.३१

अशाप्रकारे काट्याचा मार्ग सारून राजमार्ग बनविला

"लढवुनी गनीमी कावा । बहु हतबल केले रिक्त
...स्वातंत्र्याचा सूर्य उगवला रायगडावरती
शिवाजी झाला छत्रपती" आ.पृ.३१,३२

म्हणून आजही कुंजविहारी भारतीयांना म्हणतात-

"शिवरायांचे स्मरण मराठ्या उतरि धरि कांही
कृतिविण दास्य ढळत नाही" आ.पृ.३२

'मराठा गडी यशाचा धनी' कविता म्हणजेच नरवीर तानाजीचा पोवाडा आहे. जिजाऊ आऊसाहेबांनी कोंढाणा घेण्याची इच्छा व्यक्त केली आणि तो कामगिरी शिवरायांनी तानाजीवर सोपविली. घरी मुलाचे लग्न असतानाही ती कामगिरी तोलली.

शुभ शकुन शिवाची आज्ञा । साधुनी मनाचा मुहूर्त
रणि वीर निघे झुंजार । स्वसुखावर हाणुन लाथ. आ.पृ.३९

कोंढाणा किल्ल्याचे राखण उदयभान मराठ्याच्या भीतीने रात्रंदिवस करत होता. तानाजीने गोंधळी बनून 'स्वातंत्र्य पोत' पाजला व लोकांना फितूर करून घेतले. अष्टमीच्या काळ्या रात्री गडावर हल्ला केला. युध्दात शिणलेल्या सिंहावर उदयभानाने हल्ला केला. नरकेसरी तानाजी रणांगणि पडला. सुर्याजी व शेलारमामा यांनी नंतर गडावर झेंडा फडकाविला. तो झेंडा स्वाभिमानी स्वातंत्र्याचा होता, असे हे मर्दानी श्रध्दाबीज खडकांवर उगविले.

'धरि हृदयी अग्निज्वाले' ही कविता राष्ट्रभक्त कै.जगन्नाथ मोरेश्वर सामंत

यांच्याविषयी आहे. हे सोलापूरचे तत्कालीन त्यागी व निःस्वार्थी देशभक्त होते. त्यांचा विपन्नावस्थेत अंत झाला. तेव्हा कवी म्हणतात. 'दृढ श्रध्देचे विमल सुमन सुकले'', हे शहराचे भूषण अजि हारपले ! कवीला प्रश्न पडला सामंत कोणाला समजायचे? शरीराला की शरीरातील चैतन्याला का त्याहून निराळ्या शक्तीला. पुढे म्हणतात-

'अति उतावळ्या सदय अग्निच्या ज्वाला । कुरूवाळिती सामंताला

हा तपोनिधी हरिदिन धरित समाधी । पुण्यात्मा आशावादी ।'' आ.पृ.३५

'श्री शिवरायांची आरती' या कवितेत शिवरायांच्या चरित्राला आरतीच्या रूपात भारतीयासमोर चित्रित केले आहे. परवशतेवर मात कशी केली हे चरित्रातून पहायला मिळते. तोच मार्ग आपणही अवलंबावा हे येथे सूचित केले आहे.

'सेनापति बापू गोखला' या कवितेत गोखले विषयी कवी म्हणतात-

''लेखणी करी कीर्तीची-रूधिराची बनवुनि शाई

धावत्या काल पुरूषाच्या-काळजावरी लवलाही

रोखेल समरसंगीत-बहुमोल, मोल शिवराई

मुदे उदयांच्या इतिहासाला आनंद अर्पिला'' आ.पृ.४३

असं लिहणे योग्यच आहे. सेनापतींनी आपल्या कृतीने स्वातंत्र्य गीते लिहली. ती गीते क्रांतीची होती. की ज्यामध्ये जगज्जेत्याच्या खुणा दिसत होत्या. शेवटी कुंजविहारी म्हणतात-

'प्रथम हरिकथा, स्वतंत्रता मग सावधानता पुढे

मार्ग हा मुक्तिमंदिराकडे।'' आ.पृ.४३

'तयाला तुरूंग भिववील किती' या कवितेत सेनापती बापटा विषयी लिहिले आहे. बापटांनी प्राण प्रणाला लावुनि प्रेमाने राजकारणात उडी घेतली आहे. त्यांनी लोहशृंखलेला मानले नाही. स्वार्थ त्याग केला. मात्र शत्रूपुढे मान वाकविली नाही.

"देशास्तव सर्वस्व समर्फिन ध्येय जयाचे निळे

तया ग्रह कारागृहासारिखे" आ.पृ.४६

स्वातंत्र्य मिळविताना अनेक बंधने येणार परंतु कोणतीही बंधने त्यांना आडवू शकत नाहीत.

"स्वातंत्र्यस्फूर्तिचे सिंचुनि अमृतकण

मृत मानवतेला आणित संजीवन

तो सेनापति कधि साहिल का बंधन?" आ.पृ.४६

'टाक पुढे पाऊल' या कवितेत पुन्हा एकदा महात्मा गांधी विषयी लिहले आहे. जगामध्ये अहिंसा व्रताने स्वातंत्र्य मिळविण्याची ईच्छा फक्त गांधीनी केली. यासाठी फक्त आत्मविश्वास त्यांच्या बरोबर होता.

"विवेकवादी विश्वमित्र तू सुशील सत्याग्रही

तुझी एकली चाल 'मोहना' वंदील सारी मही" आ.पृ.५३

अशी थोर महती कुंजविहारी सांगत आहेत.

'जयहिंद' या कवितेत नेताजी सुभाषचंद्र बोस यांना भारतभूचा उज्ज्वल प्रतिभेचा, दृष्य राजश्रीचा, जनतेचा नेता म्हटले आहे. त्याच्या साहसवृत्तीने मरेन किंवा मारेन हा कृतनिश्चय केला आहे.

'संकट कंटक पदतलि तुडवित बलशाली

'दिल्ली चलो' गर्जना घुमवित भवताली ।" आ.पृ.५६

कुंजविहारी या नेत्याला 'चिरंजीव','विजयी भव' या पदव्या देतात व त्यांना 'गीता सुभाषितांचा सुभाष संदेश' आहे असे मानतात.

'गुरूजन गौरव' ही कविता श्री.गोविंद पंढरीनाथ शिदोरे व श्री.गोविंद परशुराम पटवर्धन या शिक्षक द्वयांच्या सत्कार प्रसंगी लिहिली आहे. गुरूमाहात्म्य अनेकांनी

गायिले आहे. इथे कवी म्हणतात गुरूपद जन्मदात्याहून कमी नाही. त्यांच्यामुळे जीवन सार्थक होते. गुरूचे व्रत म्हणजे सुविचारांची सदैव पेरणी करणे, सर्वांना सुखी करणे.

"सज्जन दर्शन सदगुण-पूजन गुरूजन गौरव घडे

सत्कीर्तीसह सत्कृतिचेही गाजतात चौघडे ।" आ.पृ.६२

त्यांच्या आशीर्वादाने नक्कीच दिवस चांगले येतील.

'मंगळावरती' ही कविता महर्षी धोंडो कर्वे जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

'दृढ निश्चय करि तव परिस्थितीवर मात

जन जागृति म्हणजे मनामनाशी झुंज

झुंजार वीर मति प्रसन्न तेज:पुंज" आ.पृ.८४

ज्ञानमानधन वंचित कुणी असतील तर त्यांना मायेचा हात देत. कर्वेचे कार्य म्हणजे - "अति पवित्र व्रत तव सकळ लोक कल्याण" असे आहे. कर्वे महाराष्ट्र संतान आहेत. धन्य-पितामह आहेत, धन्य तपस्वी आहेत तर मन मृत्युंजय अवतारी आहे. सुबोध गीता आहेत. कर्वेचे ज्ञान सर्वपरिचित आहे.

'सैन्य चालले पुढे पुढे' ही कविता गोवा मुक्ती संग्रामावरील आहे. या कवितेत गांधीच्या 'सत्याग्रही' तत्त्वाचा अवलंब केला आहे. गांधी नसले तरी त्यांचे हजारो अनुयायी होते. या तत्त्वाचा अवलंब करून हे सैन्य पुढे पुढे चालले व गोवा मुक्त केला.

"त्या सहजीवन संसाराचे परमार्थाशी सख्य घडे

धर्म, अहिंसा व्रत सत्याग्रह सैन्य चालले पुढे पुढे" आ.पृ.८८

**(२) पौराणिक वीर विभूती -**

'सावित्री गीत' या कवितेतून कवींनी सावित्री या पौराणिक व्यक्तिरेखेच्या रूपाने राष्ट्रभक्तीची निष्ठा कशी असावी हे सांगितले आहे.

'यमधर्मावर विजय मिळवुनी पती आणि मागु ती
भरतभूमिला भूषण बनली श्री सावित्री सती ।" आ.पृ.३६

मरणप्राय अनेक यातना झाल्या तरी तिने तिचा 'पतिव्रता' धर्म सोडला नाही. शेवटी तीच जिंकली हे फळ कशाचे? निष्ठेचे. अशीच स्वातंत्र्य सेनानी यांनी निष्ठा बाळगायला हवी. स्वातंत्र्य नक्की मिळेल.

'महावीर' यांच्या चरित्रातूनही आत्मस्मृती, आत्मशक्ती, मानवता आदीचे ज्ञान होते. महावीरांचा जन्म या सर्वांसाठीच होता.

"मरण्यासाठी जन्म घेति जन मरूनि उराया हवेजनी
तेच वीर ते महावीर ते महातपस्वी सिध्द मुनी ।" आ.पृ.१०१

यासाठी जन्म असतो. बुडणारांना हात देण्यासाठी तसेच त्यांचा संदेश भारतीयांना आहे. सत्य, अहिंसा, प्रेमानेच मानवतेचा ध्वज फडकणार आहे. या तत्त्वाचाच सर्व भारतीयांनी अवलंब करावा. हे या व्यक्तिचित्रणातून सांगितले आहे.

'रामराज्य' भारतातील नव्हे तर सर्व हिंदूचे, सर्व स्तरातील लोकांचे आराध्य दैवत, आदर्श राजा म्हणजे श्रीराम आहेत. त्यांच्या चरित्रावरून आपण स्वातंत्र्याचा संदेश घेवू. राष्ट्रवाद उदयाला आला १६ व्या शतकात. त्याची लक्षणे पाहिली असता ती सर्व लक्षणे रामराज्यात दिसतात. श्रीरामच सर्वांचा वाली होता. त्यांचे राज्य लोककल्याणकारी होते. ते एकसंघराज्य होते;

"सर्वभू तहितरत राजा राम आयोध्येचा
तोच पिंड ब्रम्हांडातिल अम्हा मानवाचा ।" आ.पृ.१०२

अशाप्रकारे या पौराणिक वीर, विभूती आहेत. तसेच आधुनिकही वीर, विभूती आहेत. या सर्वांच्या जीवन कार्यातून दुसऱ्याला देणे हा गुण दिसून येतो. लोककल्याण करणे हाच या सर्वांचा मुख्य हेतू आहे. म्हणूनच त्या सर्वांना प्रेरणादायी ठरतात.

स्वातंत्र्याची प्रेरणा देण्यासाठी पारतंत्र्याची चिड
निर्माण करण्यासाठी व लोककल्याणार्थ झीजण्यासाठी
कवीनी वीर पुरूषाचे त्यांच्या कार्याचे कवितेतून
गुणगान केले आहे.

**७) सामाजिक कविता -**

राष्ट्रवादाचेच दुसरे अंग समाज विकास आहे. तोच त्याचा मुख्य घटक आहे. म्हणून सामाजिक कवितेचे महत्त्वही राष्ट्रीय कवितेएवढेच आहे. त्याचाही आढावा कुंजविहारींनी आपल्या कवितेतून घेतला आहे. यामुळे समाजाला नक्कीच चुकांचे भान येते. अत्याचाराला वाचा फुटते. ते केवळ अन्याय ठळकपणे कवितेत चित्रित केल्यामुळे.

कुंजविहारी राष्ट्रीय घटनाचे निरीक्षण करीत असतातच. तेव्हा त्यांना समाजातील प्रत्येक स्तरातील कष्टप्रद जीवनही जाणवते. त्यांचा वावर सर्व स्तरातून आहे. 'हुरडा' या कवितेत अशीच दुःखदायक स्थिती मांडली आहे. जालीयनवाला बाग हत्याकांडात हजारो माणसांची कत्तल झाली. ही राष्ट्रीय घटना सर्वांना दिसली. परंतु शेतकऱ्यांच्या रोजच्या मरणाकडे कुणाचे लक्ष जात नाही. रानच्या राजाची सुध्दा अशीच मान मोडली जाते. हत्येमध्ये मरण एकदम येते पण रानच्या राजाला क्षणाक्षणाने झिजून मरणाकडे जावे लागते. स्वतःचे मरण स्वतःच पहावे लागते.

पूर्वी हा रानराजा सुखात होता. परंतु आता त्याच्यावर शस्त्र चालवली जात आहेत. त्याने कष्टाने पिकविलेल्या पिकांच्या, कणसाच्या माना मोडल्या जातात.

पिकाची नासाडी केली जाते. त्याच्या डोळ्यादेखत हे सर्व हतबल होऊन पहावे लागते. कुणाला ओढतात, कुणाला तुडवितात तर कुणाला जाळतात. किती जन्माचे वैर आहे म्हणून ते आता साधवून घेत आहेत. या वेदनेला अंत नाही. कवी म्हणतात ; 'रानगावच्या राजावरती शस्त्रास्त्रे चालविती...बलहिनांच्या देवा असती कसे किती हाल" गीत पृ.३०  या हालामुळे वेदनेमुळे रानराजाच्या मनात बंड करण्याचे विचार यावे पण तसेही नाही. तो या नरपशूच्या थडग्यापायी माती होऊन राहणेच पसंत करतो.

'हुरडा' कवितेमध्ये दु:ख चित्रित केले आहे. तसेच शेतकऱ्याचे दु:ख सविस्तरपणे 'येऊ दे करूणा' या कवितेत चित्रित केले आहे. याविषयी कवी या कवितेत म्हणतात-

"येऊ दे करूणा । करूणा संकटी हतबल शेतकरी
येऊ दे करूणा । करूणा गोविंदा, बुडाला शेतकिया धंदा
पाहुनी त्याला होतो सुखरूप, वाढत्या वंशाचे रोप
लाभला नाही नाही देवाला, नेति त्या रिकरू-भरतीला"          गीता पृ.३१,३२

शेतकरी संकटाने हतबल झाला त्याला व गुरांनाही खायला नाही. गुरे मेली, शेतीचा धंदा बुडाला. काही शेतकऱ्यांचे हिरवे रान असले तर त्याचीही अवकाली पावसाने नासाडी झाली. आजवरची मेहनत वाया गेली. पुन्हा नांगरणी, पेरणीसाठी कर्ज काढले. अनवाणी पायाने मशागत केली. परंतु त्यावर गावगुंड, भाऊकी टपून बसली. आता काहीच नाही. शेतकरी म्हणतो 'गुरांना काय माझी हाड उगाळून घालू' अशीच दयनीय अवस्था होते.

पुढे सावकाराचा तगादा सुरू झाला. तर इकडे नशीबही कोपले. कोण जाणे खाटकाला गाई विकल्यामुळेच झाले असावे. शेतकऱ्याचा 'सावळा' मुलगा युद्धात,

मुकला. सून, मुलगी विधवा झाल्या. जप्तीत घर गेले. शेतकरी अज्ञान म्हणून सावकार छळतो.

"संकटी रूतला शेतकरि अपुला । जगाचा हा पालनवाला"

गीत पृ.३३

या संकटातून कुंजविहारी जगन्नाथच वाचवू शकेल.

शेतीकडून कुंजविहारी आता नोकरशाहीकडे वळले आहेत. याचे चित्रण 'नोकरशाहीची आरती' या कवितेत आले आहे. शेतकऱ्याला जसे लुटले तसेच वडिलोपार्जित संपत्ती ब्रिटीशांनी लुटून नेली.

"हक्काने हिसकावुनि घेऊनिया लोणी

जनतेलागी देशी ताकाचे पाणी"  आ.पृ.९

इथल्या ब्रिटीशांच्या दलालांनी देशाला दुर्गतीला नेले आहे. नोकरीने म्हणजेच 'सुर्तो रूपयाने' विद्येचे वाटोळे केले. कवीला नकली औदर्याचा तिटकारा येतो. या परिस्थितीवर मात एकच ती म्हणजे आर्ययशोध्वजाला फाडून त्याचा पोत करणे व तो पिरविणे. त्यात स्वार्थीजनही मिसळतील. म्हणजेच क्रांतीशिवाय दुसरा मार्गच नाही हेच खरे. यामुळे खरी लोकशाही येईल. पूर्व परंपरेला या नव्या जोतीने उजाळा कुंजविहारींना या क्रांतीतून द्यावयाचा आहे.

शेतकरी, कष्टकरी यांच्या वेदना इतक्या भयानक आहेत की, दुःख सुध्दा गोठेल. या वेदनेचे उदाहरण म्हणजे 'करी बाळा जो जे गाई' ही कविता आहे. ही कविता प्रासंगिक असली तरी या कवितेत असणारी पिळवणुकीची वृत्ती आजही दिसते. शेतकरी धरण बांधल्यामुळे घरादाराला पारखा झाला. तसेच युध्दामध्ये त्याचा मृत्यूही झाला. घरी त्याची बायको प्रसववेदनेने व्याकुळलेली अशा घराला पारख्या झालेल्या अवस्थेत ती बाळाला जन्म देते ;

"घरदार नाहिसे झाले

सौभाग्य हिरावुनि नेले

अपरात्री तस्कर शिरले

मज बांधुनिया पुडके नेले तेही" आ.पृ.१३

यामुळे बाळाला निवारा नाही. वाऱ्या पावसात झाडाखाली ती बसली आहेत. टाळूला तेलसुध्दा नाही. अशात शिपाई तिची विटंबना करतात. तरीही बाळासाठी जगते परंतु आता जगणे शक्य नाही. उपाशीपणामुळे अंगात ताप भरला आहे. औषध नाही, आता जगण्याची आशा संपली. ती बाळाला म्हणते - "यापुढे तुला रक्षिल धरणीमाता' या विश्वासावर तिने बाळाचे शेवटचे चुंबन घेऊन त्याला पालखीत निजवले. त्याला व जगाला सोडून जाते. तेव्हा कवी प्रश्न करतात - 'हे धर्मात्मा, पालनेवाला कोई ।"

खेडूतांना शहराचे सुख चांगले असेल असे वाटते. म्हणून तो शहराकडे येतो पण त्याला भयानक अनुभव येतो. तो 'शहराचे सुख' या कवितेत चित्रित केला आहे. शहरातला माणूस यंत्रप्रधान बनला आहे. या कामगाराकडून वकील, डॉक्टर, चोर, घरमालक पैसे काढत आहेत. तर शहरातले वातावरण कसे आहे तर ढेकणाने, डासाने, उंदराने भरले आहे. इथं राहणे म्हणजे नरकात राहणे आहे. इथला खानावळवाला पैसे घेऊन अन्नदान करतो. चहा, मिसळ सर्व काही उष्टे, खरकटे खातो. हे सर्व बांधून तो शहराचे नाव काढत नाही. याच्यापेक्षा खेडच बरं कवी म्हणतात ;

"भारतभूमी शहरांमध्ये दडुनि नाही बसली

मला तरी ती खेड्यामधल्या झोपडीत दिसली" गीत पृ.३५

'म्युनिसिपालिटीची आरती' या कवितेतूनही शहराचे वर्णन चालू आहे. म्युनिसिपालिटीला कचरापेटीची किंमत आहे. ती परकी फॅशन अनुकरते तिच्यात स्वार्थीपणा आला आहे त्यामुळे ती कर्जबाजारी झाली आहे तरीही तिला नव्या



UNIVERSITY LIBRARY

इमारती, सडका बांधणे आवडते. पण हे सर्व चांगल्या वस्तीत, कामगार वस्तीत काय? तर -

"रोग भयंकर दडती बोळा बोळांना

लठ्ठ पगारावाचुनि अधिकारी अडला ।" आ.पृ.१८

सगळीकडे घाण, अंधार, पाण्याची वणवण, नवीन कर, खोलीचे वाढणारे भाडे हे सर्व चालले आहे. कशामुळे तर जनता अडाणी, निर्लज्ज असल्यामुळे.

सांस्कृतिक क्षेत्रात सुध्दा हीच अवस्था आहे. ते 'नाटक-सिनेमा महात्म्य' या कवितेत सांगितले आहे.

"जय काव्यदेवी कुळकलंका । जय प्रत्यभक्षक पावला

...नाट्यमहिमा वाढला फार । ओस पडले भानुपुत्रनगर ।"

गीत पृ.४१

पुढे कवी म्हणतात -

"नाटकाचा संसार जाहला । कलाविलास ल्यास गेला"

म्हणून कवीला वाटते की, सुधारणेच्या माध्यमाने तरी काही मार्ग दाखवायला हवा-

"समाजटीका अवश्य कीजे । परी सुधारणेचा मार्ग दावि जे।" आ.पृ.४२

असा संदेशही दिला आहे.

'अर्जी' या कवितेमध्ये भारतीयांचे चित्र रेखाटले आहे -

"धोकर खडा हूँ मै आँसूसे हात

निकलती है कलिजेसे बात" आ.पृ.४२

अशी अवस्था चित्रीत केली आहे.

सामाजिक कवितेतून कुंजविहारींनी समाजाचे अचूक चित्रण केले आहे. मर्मावर अचूक बोट ठेवले आहे. त्यावर काही वेळेला उपायही सांगितले आहेत. ही समाजाची

स्थिती कुंजविहारी कालीन होती ती आजही तशीच दिसून येते. "स्वतंत्रता नच स्वार्थ आसुरी ते जीवनसौंदर्य नवे." ही स्थिती सगळीकडे दिसून येते.

**८) लोकशाहीचे आदर्श चित्र -**

अनेकांनी आपल्या प्राणाचे मोल दिले. अनेकांनी घरादाराची रांगोळी केली. अनेक अत्याचार सहन करून अनेक वीर फासावर गेले. ब्रिटीशाविरूध्द स्वातंत्र्यासाठी लढले. स्वातंत्र्यामुळे सर्व भारतीयांना सुख येईल असे वाटले. अखेर स्वातंत्र्य मिळाले. सगळीकडे आनंदी आनंद झाला. परंतु स्वतंत्र भारसासमोर नवे प्रश्न उभे राहिले. आदर्श लोकशाहीचे चित्र काही कवितेतून कवीने चित्रित केले आहेत. ते खालीलप्रमाणे ;

'स्वराज्य सोहळा' या कवितेत स्वातंत्र्याचा दिवस कसा आहे हे सांगितले आहे. शिवशक्तीच्या लग्न सोहळयासारखा हा दिवस आहे.

"धर्मचक्र चिन्हांकित राष्ट्रध्वज हा गगनी डुले

कोटिकोटि करकमलांनी प्रेमे ज्या पूजिले" आ.पृ.५७

आता नव्या मनूची अमृतध्वनी असेल. समता, ममता, स्वतंत्रता देशात असेल. पूर्व संस्कृतीची कीर्ती वाढण्यासाठी प्रसन्नतेची आस ठेवू, शुभ कर्तव्य करू. ज्ञान ज्योतींनी 'नवजीवन' पथ सदैव उजळवून ठेवू. असे स्वातंत्र्याचे, लोकशाहीचे, कर्तव्याचे चित्र रेखाटले आहे. 'स्वराज्य सुख' येण्यासाठी श्रीहरीला मागणी मागितली. भारतभूमी सुवर्णभूमी होती. तिथे दारिद्र्यात आले आहे. या भूमीवर सुपुत्राप्रमाणे कुपुत्रही आहेत. भल्याबुऱ्याने ती भरली आहे. म्हणून कवी मागणी मागतात.

"कधी विषाचे अमृत होइल दुर्जन सज्जन कधी

..गळयात घालुनि गळा नांदविल कधि नांगर लेखणी" आ.पृ.५८

स्वर्ग साम्राज्य नको संसारी माधुरी येवू दे. त्यामुळे भारतीयांच्यात आनंद येईल -

"अंतरवीणा सुखदुःखातुनि गाजु दे वाजु दे।सच्चिदानंदही जगु नांदु दे।" ही सद्भावना कवीने व्यक्त केली आहे. यापुढे जाऊन कवी म्हणतात - "प्रसन्न होशिल कुटूंबवत्सल देव। केंव्हातरी" असा आनंद भारतात यावाच हीच अपेक्षा.

स्वराज्य म्हणजेच नारायण, प्रत्यक्ष नारायणाचा सहवास ही भावना 'स्वराज्य नारायण' कवितेत व्यक्त झाली आहे. स्वतंत्रता म्हणजे शिवाजी व शिवरायाची शक्ती होय. ज्ञानेशाच्या पुण्याचे फळ. देशभक्ताने केलेल्या जागृतीचा सोहळा आहे. परदेशी सुतक संपले. नारायणाची आता साथ लाभेल गृहपीडा संपली आता कल्याणमयी आराधना राहिली. आता फक्त-

"सत्कर्माची आत्मश्रमाची पराक्रमाची फुले
जनीजनार्दन पदी उधळुनी उध्दरू कोटीमुळे
ज्ञान नवे धन नवे तयासह कार्यक्षेत्रही नवे
नूतन राज्यश्रीस्तव नूतन जनगनमनही हवे" आ.पृ.६०

म्हणून धर्मचिन्ह चक्रांकित राष्ट्रध्वज आपण नभात फडकवूया.

स्वातंत्र्य मिळाले परंतु खरे स्वातंत्र्य मिळायला हवे. हे 'सुराज्य झाल्याविना' या कवितेत सांगितले आहे.

"स्वराज्य झाले म्हणुनि भारता गर्व वाहसी वृथा
सुराज्य झाल्याविना व्रताची कुथीन हो सांगता
इंग्रज गेले निजधामा ही असे कल्पना खुळी
अंतःकरणी रूतून बसली परवशतेची मुळी।" आ.पृ.६१

सगळीकडे सत्वहीन संसार दिसतो आहे. मृत्यूभयाने काहीजण जीवन जगतात. असूर वृत्तीचे लोक त्रास देतात - "रात्रदिन थैमान घालिते कृतघ्नता क्रुरता" असे असल्याने भूक शमली नाही.

"मरण चुकेना परि मरणाचे कारण होऊ नका

निजनिष्ठेने जनगणमंगल स्तववायला शिका" आ.पृ.६१

हा संदेश अंगीकारला तरी चांगले दिवस येतील.

भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहेच. परंतु भारतीय लोकशाही सुध्दा श्रेष्ठ चिरंजीव व्हावयाची असेल तर समता हा गुण प्रकर्षाने अवलंबायला हवा असे 'चिरंजीव होवो जगी लोकशाही' या कवितेत कवी इच्छा व्यक्त करतात हे जगदीशा तुला वंदन. राजधानी व खेडे हा लोकगंगाप्रवाही भेद नको, मानहानी नको, आंधळी पांगळी देशभक्ती नसावी. सर्वाला अन्नवस्त्र मिळाले पाहिजे. प्रजा विवेकी कर्मयोगी असावी.

"सदाचार हा ध्यास सर्वा जनांचा

नसो येथ दुष्काळ तो सद्‌गुणांचा" आ.पृ.६६

असे असेल तर विश्वसंचार भारतात साकार होईल.

दिल्लीचे महत्त्व हे की ती अनादी काळापासूनच राजधानी बनली आहे. 'राजधानी' कवितेत कवी राजधानीचा गौरव करतात. या राजधानीत ज्ञानी लोक, अद्वैत भक्ती करणारे लोक राहिले. इथले हरिजनाचे सुस्वभावी नेतृत्त्व वेड लावते. इथल्या संस्कृतीत सामर्थ्य आहे. इथेच श्रीकृष्णाने अजुर्नाला ज्ञान दिले. इथेच गांधीजींचे गणराज्य, सत्य, अहिंसा, सत्कर्म-धर्म-योगी ही भावना ब्रह्मांड व्यापून गेली, अशी ही दिल्ली आहे.

हिंदूधर्म सर्वश्रेष्ठ आहे हे बुध्द, महावीर, जिन हरिहर, ब्रह्मा यांनी जगाला दाखवून दिले. त्यांनी सांगितलेल्या विचाराप्रमाणे वागले तरच 'युगवीर भावना' निर्माण होऊन सर्व जगात तिला मानले जाईल. कवी युगवीर भावनेची लक्षणे सांगतात - साम्यभावना, वासना नसणे आदी.

"स्वार्थत्याग तपस्या खडतर सहज सुखे जे आचरिती

ते ज्ञानी ते साधु जगाला दुःख कर्दमी उध्दरिती

असो सदा सत्संग । तयाचा । असो तयाचे ध्यान मनी

व्यापारी आपण करूं आचरण । हाच मानसी ध्यास जनी ।" आ.पृ.६७

तसेच मत्सर, असत्य भाषण, पर धन, पति कांता नसावे, अहंकार, वैर नसावे, गुणीजनांचा आदर करावा "धन जो ज्यापासून मिळेल गुण तो दोष त्यागुनी सेविन मी." अशी वृत्ती हवी. कुणी स्तुती, निंदा केली, कमी-जास्त आयुष्य असले. कुणी राज्य देवू लागले तरी स्वतः निवडलेल्या शाश्वत मागर्गावरून ढळू नये. निर्भयता, सहनशिलता, शांतता आचरावी.

"वैर पाप अभिमान भय नसो जीवन मात्र जगि असो सुखी

मंगल करणी, मंगलवाणी, नित्य मुखी" आ.पृ.६८

धर्मनिष्ठ, न्यायनिष्ठ, प्रजानिष्ठ राजवटीत दैन्य दुष्काळ नको. जलवृष्टी, शांती असो. रोगराई नसो, प्रेमपूर्ण संसार असावा. कवी म्हणतात ;

"परम अहिंसा धर्म तत्व जगि जिकडे तिकडे चोहिकडे

अप्रिय कटुवा, कठोर शब्दहि कधी नसावा।मुखामधी

म्हणेल कुणी 'युगवीर' जगि धन्यवाद त्या देऊ" आ.पृ.६८

'स्वराज्य रथ सारथी' या कवितेत स्वराज्य मनातील मंगलता दाखविते. पूर्ण पुण्य चांगले म्हणून स्वराज्य मिळाले आता एकच विचार करूया.

"सूज्ञ अज्ञ वा धनी दरिद्री कसे नांदतिल कधी सुखी

साहय करू सहकार्य करू या क्रियाशक्तिही एकमुखी

जीवन म्हणजे जनामनांतिल नित्य युध्द हे तुका म्हणे

सहजीवन संजीवन मन मिळे यशश्री कोटि गुणे

अथरूनी सत्कर्म योग नित मार्ग दावितो लोकमता।" आ.पृ.७२

यामुळेच स्वराज्य मंगलमय झाले.

स्वातंत्र्य मिळाले परंतु दु:ख, दैन्य, गरीबी आदी प्रश्न समोर उभे राहिले. यावरील उपाय योजना म्हणजे पंचवार्षिक योजना या योजना सहकार्यावर आधारित होत्या. सहकार्य हा प्रगतीचा पाया होता. ते तत्त्व कुंजविहारी 'सहकारी गीत' या कवितेत सांगतात. सहकार्यानेच स्वतंत्रतेला जीवन मिळेल सहकार्य लोकशाहीची माता, शिवाची शक्ती आहे कारण;

"रविचंद्रासह जीव वनस्पती अखिल चराचर हंसे
सृष्टिला सहकार्याचे पिसे।" आ.पृ.७३

हा तर सृष्टीचा मंत्र आहे. मानवता मनुष्य पंचमहाभूताच्या एकत्रीकरणाने होतो. सहयोग हा तर दैवीगुणे आहे. त्यामुळे पाप, ताप नष्ट होते.

"मति निती निपुण कृति सुवर्ण बावनकशी
सौजन्य जन्मू दे लोकशाहीच्या कुशी
धजे लोककल्याण भारती दु:ख दैन्य हे हरी
होऊ दे राज्य तुझे भूवरी ।" आ.पृ.७३

हे सर्व सहकार्याने शक्य आहे.

'धन्य आजचे तरूण' या कवितेत श्रमपूजेचे महत्त्व सांगितले आहे. आजच्या भारताच्या आर्थिक परिस्थितीत बदल करावयाचा असेल तर श्रम करायला पाहिजेत.

"श्रम कर्माचा धडा शिकविते ती जन्मापासूनी
मातृभूमीचे प्रेम उसळु द्या परिश्रमे या क्षणी
नव्हे परिश्रम वज्रलेप जणु जगदंबेचा म्हणा
याच तपातुनि सुखे प्रगटतिल समृध्दीच्या सुखा
कराल नव साधनेस मिळुनी समर्थ तरि व्हाल

धन्य तरूण तुम्हाला वंदित कर्दनकाळ" आ.पृ.७१

'उद्याचा देव असावा कसा' या कवितेत कवीचे म्हणणे असे की, सर्व काही भारतीय लोकशाही मध्ये नवे आहे. मग देवच का जुना. अनेक देवांमुळे एकीची भावना राहत नाही. इथले नियम वेगळे, समरभूमी वेगळी त्यामुळे भगवदगीता सुध्दा नवी हवी आहे. भारतीय लोकांच्यात विविधता आहे. कुटुंबात एकी नाही. त्यांच्या माथी लोकशाहीचा ठसा उमटविण्यासाठी देवही वेगळा पाहिजे. निधर्मी राष्ट्र म्हटल्यानंतर सर्वांना एकसारखे पंचांग नावे, देव असावा. देव असा असावा त्याच्या देवालयाने पारणे फिटावे, त्याला देवच मानू नये की, ज्या निर्णयामुळे शंका निघेल.

"देव असावा असा मुखामधि जसा रंगडा विडा

स्वरूप सुंदर साधे तरिही रूबाब तो केवढा

देव असावा असा दुधामधी साय दिसावी जशी

ताप साहुनी उज्वल होते सुवर्ण बावनकशी

देव असावा विश्वकुटुंबी कविजण वेडा पिसा" आ.पृ.८३

तरीही प्रश्न उरतो उदयाचा देव असावा कसा? त्याला मातापिता असतील, गाव असेल, गृहदेवता असेल, शेती असून जोंधळे पिकविल, गाईगुरांचा लळा असेल, रानपाखराप्रमाणे पुढारी फिरू लागले की विरोध करेल. श्वापदे येतील तेंव्हा भिऊ नका हा सल्ला देईन. ज्ञानपूर्णता, दीनाला उध्दारणारा, माणुसकी असणारा तो विठ्ठल असावा.

आशावादी कवीच वर्तमान लक्षात घेऊन भविष्याचे सुंदर चित्र रेखाटतो. आणि ते प्रत्यक्षात आणण्याची प्रेरणा देतो. आदर्श लोकशाहीचे चित्र कुंजविहारी रेखाटतात. तसेच आदर्श लोकशाहीची तत्वही सांगतात. एवढेच नव्हे तर अनेक देवामुळेच माणसात द्वैत येते म्हणून देव असावा असे सांगतात,

ज्याला ब्राह्मण कुटूंबातील परंपरागत संस्काराने कुंजविहारी वाढले असल्यामुळे हिंदूधर्म, देव, देवता संस्कारात कुंजविहारी वाढले असल्यामुळे हिंदूधर्म, देव, देवता सांस्कृतिक अभिमाान काही कवितेतून प्रकट होतो.

**९) गोंधळगीत, भूपाळी, आरती, स्तवन, प्रार्थना इ.लोकगीते -**

राष्ट्रीय कवितेचे एक लक्षण म्हणजे स्तवन करणे, लोकांना परिचित असणाऱ्या काव्यप्रकारातून त्यांना उपदेश करणे सोपे जाते. म्हणून कुंजविहारींनी भूपाळी, आरती, गोंधळ, प्रार्थना या लोकरूढ लोकगीतांचा उपयोग राष्ट्रभक्ती लोकांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी केला. कुंजविहारींना शाहीर असेही म्हणतात ते यामुळेच.

नरवीर तानाजीने गड मिळविण्यासाठी गोंधळ घातला. इथेही कवी स्वातंत्र्यासाठी 'गोंधळ' कवितेत गोंधळ घालत आहेत.

"स्वतंत्रते भगवती उदो गे भारतभूमी माये
शिवाभवानी विभवशालिनी गोंधळास ये ये" आ.पृ.७

तुळजापूरची अंबिका उग्र रूप धारण करून ये - 'स्वंयप्रकाशित आत्मज्योतिचा पोत पाजळिला' गणराया तेहतिस कोटी देव, शिवराया, कृष्णा घोडी, मालुसरे, मुरारबाजी सज्जनगडवासीयांना गोंधळास बोलविले.

तुझ्या भक्त शिवरायाने गोंधळ घातला, तोरण गडी नवरात्र घातली, प्रथम बळी विजापूरवाला घेतला. दिल्लीपतीलाही दहशत बसविली. हिंदवी स्वराज्य स्थापले असे सर्व असता आम्हावर देवी तू रूष्ट का? नंतर पेशवाईने अटकेवर झेंडा फडकविला आणि तो अष्टीत कसा पडला.

"शस्त्रहीन स्वातंत्र्यहीन आम्हि बनलो या काळी
आम्ही उपाशी परि परक्यांची पिकलीसे पोळी...
...समशेरीसह नवा शिवाजी एक आम्हा देई" आ.पृ.८



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

गोंधळ घालून नवा शिवाजी कुंजविहारीने मागितला आहे. 'नोकरशाहीची आरती' रोजची रोटी भागावी म्हणून स्वाभिमान विकून नोकरी केली जाते. ही नोकरशाही भारतीयावर अधिराज्य चालवते.

"नोकरी दया नोकरी दया म्हणती शिकलेले
विदयेचे वाटोळे नोकरिने केले
अधिष्ठात्रि देवी तू या दुर्व्यसनांची...
...आर्य यशोध्वज फाडुनि पेटवुनी पोत
पदवीधर स्वार्थीजन उदोस्तु वदतात" आ.पृ.९,१०

'संध्या' या भूपाळीमध्ये शुध्द अंतःकरणाने माधवाला संध्यासमयी एक मागणे मागतात-

"संध्यासमयी सकळ जगाचा साक्षी वंदावा
शुध्द मनाने स्वातंत्र्याचा प्रसाद मागावा" गीत पृ.५

माधवाला कवी परदास्याची बेडी तोडण्यास सांगत आहेत. आर्यभूतून धन नेवून तिला भिकारी बनविले आहे. म्हणून उपेंद्र उठ, रवीचे तेज फेक त्याने प्रत्येक मानव सूर्य बनेल. आर्यभूचा भार कृष्णा तुझ्यावीण कोण दूर करेल. हेच या कवितेतून सांगितले आहे.

'म्युनिसिपालटीची आरती' या आरतीमध्ये कवी म्युनिसिपालिटीला म्हणतो- 'लोकमता हुनि तुजला प्रियकर सरकार' ३ वर्षातून निवडणूक परंतू मेंबर काही करत नाहीत. तेथे स्वार्थी सदा कर्जाच्या ओझ्यात असते. कोणी येणार म्हटले की सडका सुंदर होतात. एरवी घाणीच साम्राज्य याच घानीतून बेसुमार जनता वाढते. हे सर्व जनता डोळेझाक करून बघते.

'श्री ज्ञानेश्वर भूपाळी' यामध्ये भागवत पंथाचा उल्लेख केला आहे.

'विजय दुंदुभीसमान शोभे टाळ मृदंग-ध्वनी

वीर वारकरि विजय मिळविती तलवारी वाचुनी'          गीत पृ.१२

या भागवताचा पाया ज्ञानेशांनी घातला. गीतेचा मराठीत अर्थ सांगितला. वनवासी जीवास

ज्ञानेश्वर भेटल्याने दुःख कमी होते.

'सोलापूर वर्णन' या कवितेत सर्व सोलापूर दैवतांना नमन केले आहे. यामध्ये सिध्देश्वर, रेवणसिध्द, रूपाभवानी, काळजापूरचा हनुमंत, मल्लिकार्जून, महालक्ष्मी, रामविठोबा, गणपती मार्कडयमुनी, बाळयाचा खंडेराया, हजरत शहाजवळी शुभराय यांना नमन केले. ही सर्व नमने 'उंबरीकर राम' यांच्या पदी वाहतो. यांच्या आर्शीर्वादानेच स्वातंत्र्याचा गोंधळ पार पडणार आहे. कवीला स्फूर्ती मिळणार आहे.

'श्री ज्ञानेश्वरीची आरती' ज्ञानेश्वरांनी त्या काळातील मानसांना भ्रममय अवस्थेतून जागविले. गीतेचा अर्थ सांगितला- मरूनही उरणे नित्यनवेपण धरणे, आत्मानंदात डुलणे, स्वतःच ब्रह्म होणे. हे संस्कृतमधील ज्ञान प्राकृतात सोपे करून सांगितले. ज्ञानेश्वरी-नौका प्रभु-नाविक निज लीले."

'श्री शिवरायाची आरती' कुंजविहारी शिवरायांना पूज्य मानत त्यांच्याविषयी कवीचे शब्द-

"त्राता मानवतेचा, प्रियकर कीर्तीचा
पावन महाराष्ट्राच्या प्रभु राजश्रीचा
श्री हरिसम मुत्सद्दी, बळ बलभीमाचे
भगिरथ प्रयत्नवादी, चरित्र श्रध्देचे
उदयोन्मुख राष्ट्राचे कुलदैवत साचे"          गीत पृ.७६

जेव्हा पदभ्रष्ट होतो तेव्हा शिव अवतार होतो. म्हणून आशा वाटते की, नक्की शिव येईल.

'अर्जी' ही एक उर्दूत कुंजविहारी लिहिलेली प्रार्थना आहे.

शहनशाह आलम् अय् परवरदिगार । अदालत मे बंदा खडा खाकसार ।

हे अरजी मेरी सुनले सही । इलाहि नजर तेरी हमपर नही नही ।

आ.पृ.११८

तुझी कृपा असते तर गुलामी आली नसती. जिकडे-तिकडे परवशता जानवली नसती. माणसाचा पराक्रम शिथील झाला. दु:ख दैन्य दारिद्र्य सगळीकडे आहे म्हणून हे ईश्वरा;

"गुलामीका धब्बा धुला दे नबी ।

न तो हिंदवाले कतल कर सभी ।"

तुझ्याच हाती सर्व काही आहे. तूच आम्हाला स्वतंत्रता दे.

'शारदास्तवन' मध्ये कवी विश्वाच्या ज्ञानदायिनीला नमस्कार करतात. हे ललित विलासिनी रणरागिनी तू प्रेम व पराक्रम या धरतीवर फुलव तू 'राज्यश्री' ची मंगलमूर्ती आहे. चैतन्याची क्रांती आहेस म्हणून मी स्वातंत्रदेवीचे नमन गातो त्याच्या प्रभावाचे बक्षीस घेण्यास-आशीर्वाद दे.

काव्याच्या वेगवेगळ्या प्रकारातून कवी कुंजविहारींना स्वत:ची, स्वातंत्र्याची भावना लोकांपर्यंत नेवून पोहचवायची होते. ईश्वराचा कौल मिळवूया. लोकांच्यात चैतन्य निर्माण करावयाचे होते. हीच या मागची भूमिका दिसून येते.

**१०) शृंगारिक काव्य -**

कुंजविहारीच्या काव्यात शृंगाराला पूर्णपणे फाटा दिला आहे. खरे पाहता आपण जी कविता पाहणार आहोत. तेवढीच एकमेव आहे. तिच्यातूनही वीरांगणाच अवतरली म्हणून वरवर ती कविता शृंगारिक वाटली तरी ते एक समरगीत आहे.

'गडे मज संगती घेवून चला' या कवितेतील तरूण तिच्या प्रियेला रणांगणावर जाण्यासाठी तयार होवू दे म्हणून विनवतो आहे. परंतु तिचा हट्ट एकच, मला तुमच्याबरोबर रणांगणावर घेऊन चला.

तो पुन्हा तिला विनवतो व म्हणतो. "तिकडे नौबती झडल्या आहेत. मला जाऊ दे. तुला बरोबर घेऊन गेलो असतो पण धन्याची सक्त ताकीद आहे 'कुणा स्त्रीला बरोबर आणू नये' तुला नेले तर मी गुन्हेगार होईन." त्यावर ती म्हणते मी पुरप्रवेश घेईन. तेव्हा तो म्हणतो नको नको तिथे रणांगणावर तू आली तर तुला समर बघून भीतीची धडकी भरेल. हे उत्तर ऐकून ती म्हणते.

"अहो मी शूराघरी वाढले आहे मला कशाची भिती वाटते" अग हो पण, समरांगणी सहवास फक्त समशेरीचा असावा तेच योग्य होईल. ती म्हणते- "गला बडेजाव नका दाखवू त्या सक्तीचा" तो तिची थट्टा करतो- तलवार रणांगणात नको तर मग काय तू खरोखरच नयनबानाने शत्रूला ठार करशील? यावर ती खोट्या रागाने म्हणते, हे वो काय? हा काय थट्टेचा क्षण आहे. तो तिचा राग काढण्यासाठी थोडावेळ थांबतो. पुन्हा जायला निघतो पण हिचा हट्ट कायम. रणांगणावर गेल्यावर वेळोवेळी खुशाली कळवीन म्हणून वचनही देतो. पण सर्व काही व्यर्थ. ती म्हणते-

"करि दया दासिची अजुनी येइना तरी?
जिवलगा तुम्हाविण जगेन का क्षणभरी
लढुनि रणांगनी विजय मिळवुनी सुखविन दोन्ही कुला
गडे मज संग होऊन चला." गीत पृ.४५

तिचा हट्ट कायम आहे. स्वातंत्र्य समरात पुरूषच लढायला सज्ज आहेत असे नाही तर वीरबालाही लढायला तयार आहेत. स्त्रीयांनीही स्वातंत्र्य समरात भाग घ्यावा. हे तर कुंजविहारींनी या कवितेतून सूचित केले नसेल?

## ब) वाङ्.मयविषयक कविता

कोणतेही साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. तसेच साहित्य समाज प्रवाहाला विचाराची दिशा देते व आपले ईप्सित साध्य करण्यास मदत करते. ही माहिती सर्वपरिचित आहे. म्हणूनचे कुंजविहारींनाही वाङ्.मयाचे व ते लिहणाऱ्या साहित्यिकाचे महात्म्य वाटते. प्रतिकूल परिस्थितीत तर साहित्याची जबाबदारी अधिक वाढते. त्या साहित्याला वरचा दर्जा प्राप्त होतो. साहित्याचे महात्म्य कुंजविहारीच्या काव्यातून अनेक ठिकाणी व्यक्त झाले आहे.ते पुढीलप्रमाणे;

श्राव्य माध्यमापेक्षा ही दृकश्राव्य माध्यमाने तर लोकांच्यावर साहित्याचा अधिक परिणाम होतो. 'नाटक-सिनेमा-महात्म्य' या कवितेतून नाटक, सिनेमा याचे महात्म्य सांगितले आहे.

"मृत व्यक्ती सजीव होती । तवाज्ञेने वर्तन करिती
ऐशी असे अद्भूत कीर्ती । देवाहूनि श्रेष्ठ तू
...परिस्थितीचा ट्रॅन्सफरसीना प्रतिसृष्टीकर्ता तू" गीत पृ.४१

नाटक भक्त एवढे आहेत की नाटकाचा एकही प्रयोग चुकू देत नाहीत. नाटकाची मजा काही औरच आहे. नाटक पाहण्या एवढी गर्दी असते की पाहण्यास जागा सुध्दा पुरत नाही. नाटकाचे वेड पृथ्वीवरच आहे असे नाहीतर स्वर्गातही आहे, तिथेही गर्दी झाल्याने दुसरा स्वर्ग बांधेपर्यंत लोकांच्या बसण्याची व्यवस्था कशी करायची. तोपर्यंत त्यांना नरकात बसून नाटक पाहता येईल. नाटकाचे महात्म्य पुढील ओळीतून व्यक्त होते.

"नाटकाची मजा और । स्वये नाचे कपूरगौर
ईश्वरी अंश मानव साचार । पहावे कवी अनुचित

नाट्यमहिमा वाढला फार । ओस पडले भानुपुत्रनगर

स्वर्ग लहान पुण्यात्मे फार । जागा तेथे पुरेना"                गीत पृ.४१

पुढे कुंजविहारी नाटकाविषयी म्हणतात -

"नाटकाचा संसार आटला । कलाविलास लयाला गेला

तळीचा गाळ वरि उसळला । किळसवाणा चिखल हा ।

चलत्‌चित्र संसारचित्र । म्हणविण्यास यापुढे होय पात्र"      गीत पृ.४२

या चलत चित्रामध्ये पूर्णपणे संसार रंगविला आहे. तरीही त्यात सुधारणा केली पाहिजे. स्वराज्य कथा, दारिद्र्य व्यथा धर्मश्रेष्ठता आली पाहिजे. भावपूर्ण ध्येयदर्शन देशकालवर्तमान, सामाजिकता ही आली पाहिजे. या सिनेमात संसारटीका हितकर असावी असा शेवटी संदेश दिला आहे.

"टीका असावी विधायक । टीका व्हावी फलदायक

परिणाम होती अनर्थकारक । टीका नोव्हे विषवल्ली"      गीत पृ.४३

'आजकालचे हितगुज' ही कविता राष्ट्रीय सभेला अधिकार प्राप्त झाला त्या ऐतिहासिक क्षणास अनुलक्षून असली तरी शब्दाचे म्हणजेच साहित्याचे महत्व सांगितले आहे. शब्द सृष्टीच्या ईश्वरा प्रभातीचा सुगंध बासरीच्या स्वराचे अर्ध्यदान दे, समाधान दे सुयश सत्यसंकल्प दे रणात पडलेल्यांना तू मुशाहिर हो.

"मम सर्वस्वाचा तू धनी । इतिहास नवा तुजपासुनी

जा विसरूनि मज गुणसंदेश । ये शब्द सृष्टीच्या ईश्वरा"

असे शब्दाला कवीने दान मागितले आहे.

'स्वागत सुमनांजली' या कवितेत कवी वाङ्‌मय सोहळ्याविषयी म्हणतात -

"सुजन मानधन रसिक सभा ही प्रेमे म्या पूजिली

वाहुनि स्वागत सुमनांजली



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नसुनि सत्यसंकल्प रूपिणी मानवता मंगला

साजरा करू वाड्.मय सोहळा"          गीत पृ.५१

या सोहळ्याला संत शुभराय, कवी रामजोशी, सिध्देश्वर, श्री गुरू दत्तात्रय यांनी यावे. कशासाठी तर हरिभक्त, रणमर्द, योगीश्वर यांनी भविष्यवाणी पेरली त्यासाठी.

'श्रवणि पेरिता मनि अंकुरतो सद्‌भावाचा मळा

फुलते फुलते जीवनकला

जीवन संग्रामी जे मिळवी अपूर्ण तेतर जय

धन्य ते अजरामर वाड्.मय"        आ.पृ.५१

कारण शब्द सृष्टीचे विद्वज्जन उगवत्या उदयाचे डोळे आहेत. परमात्य स्फूर्तीचे रत्नाचे कोंदण आहे. कवी पुढे म्हणतात "धर्मवीर औदार्यवृत्तीच्या पवित्र संगमतटी आमुची प्रेमळ वाड्.मयतटी" आहे. तो अनेकांचे मने वेधतो. 'विश्वची माझे घर' ही त्यांची भूमिका आहे. अशा प्रकारे साहित्यिकांचा ज्ञानाचा या शब्दात गौरव केला आहे.

'गा रे गुणवंता' क्रांतिकारकाच्या क्रांतीने अनेक गीत निर्माण होतात. हे बरोबर आहे. तसेच कार्य साहित्यिकाचे आहे. जनाला आळवून नवी प्रेरणा देतात. कवीच्या कार्याविषयीची पुढची ओळ पहा -

"काव्यलहरीची पृथ्वीपासून स्वर्गावर स्वारी

पुण्य वाटिका तारामंडळ परिचित ही सारी"        आ.पृ.६३

साहित्यिकाने लिहलेल्या गाण्याने लोकमनांना फुलविले जाते. कवीची भूमिका कोणती आहे यासाठी पुढील ओळी पहा -

"कवी न केवळ सुमनसखा तो मधुकर या जगती" 'देवदयेचे नजराने' कन्नड कवी प्रा.द.रा.बेंद्रे यांचा पृष्ठ्यब्दिपूर्ती कार्यक्रम झाला. समितीतर्फे सत्कार झाला.

तेंव्हा प्रश्न केला आहे. त्याचेच उत्तर या कवितेत आले. तो प्रश्न असा- "आवडशी तू जगास देवा, का आवडतो कवी तुला?" त्यावर देवाने उत्तर दिले.

"फुलांत जैसा सुगंध तैसा जगात भासे मला कवी
उसातला रस रसात गोडी गोड गोड अतिगोड चवी"

आ.पृ.७४

फुलास काटे, ऊसाला गाठी याला तुम्ही बाळांनो भीता परंतु अत्तर व साखर मागताच ना? बाळांनो तुम्ही व मी एकच आहे. मी तुमचा देवगडी आहे. पण कवी जीवन सुगंधित व रसमय करतो म्हणून तो मला आवडतो. मी जरी जगाचा तारणहार असलो तरी मलाही कुणीतरी पाहिजे ना? कवीनेच मला पाळले-पोषले, माझ्यात व माणसात भेद नाही. मी प्रेमरसाचा सागर आहे तर तुम्ही तुषार. आपल्या दोघांनाही कवीच्या राज्यात काही कमी नाही. असे बोलून देव हसला तेव्हा कवीला आनंद वाटला.

'कविकल्पना' ही कविता रवींद्राच्या एका कवितेतील कल्पनेवरून घेतली आहे. कवी, कविता व त्यांच्या कल्पना या सर्वसुंदर आहेत.

"कवि देवाचा, देव दयाळू लेववि ज्ञानांजना
मनामनावर राज्य करी जगि रवींद्र कविकल्पना" आ.पृ.८९

दुःख सहन केल्यानंतरच प्रीती येते. दुःखात साथ असते ती कवीच्या प्रतिष्ठा श्री कवितेची.

"जिती जागृती ज्योत प्रितीची कविता कविकल्पना
सुखे शोधिते देवाघरच्या हारपलेल्या सुखा" आ.पृ.९०
जीवन जगण्यास मंत्र स्फुरतो तो कविकल्पनेमुळे
देव कवीचा धर्म कवीचा कवी जीवाचा सखा

प्रभाव त्याचा स्वभावसुंदर रवि तेजासारखा ।" आ.पृ.९०

कविता ही विद्युत कलेसारखी असते तिच्या कल्पनेला चौकट नसते. ती जीवनसाथी असते तिच्यात सद्‌गुण, सद्‌भावना असतात.

"ही निर्भयता प्रसन्न कविता, प्रसन्न जीवनकला

जगी फुलविते आत्मसुखाचा आनंदाचा मळा

देव गुरू की धर्म गुरू 'कवि जनगन' गुरूदक्षिणा" आ.पृ.९१

अशाप्रकारे कवी, कविता व कविकल्पना यांची महती सांगितली आहे. यांना मानवाच्या नव्हे तर ईश्वराच्या ही जीवनात स्थान आहे. हा प्रतिसृष्टीकरता केल्याच सृष्टीत घेऊन जातो. दुःख विसरायला लावतो. आत्मानंद देतो. असे वाङ्.मयाचे कार्य आहे.

**क) अध्यात्मविषयक कविता**

**१) भावगीते -**

ईश्वर व भक्त यांना जोडणारा दुवा म्हणजे भक्ती. शुध्द मनाने केलेली भक्ती ही सर्वश्रेष्ठ भक्ती असते. भक्तीच्या नात्याने भक्त तन-मन-धनाने ईश्वराला अर्पितो. अंतर्बाह्य तो ईश्वरा रूप होतो. ईश्वरापर्यंत पोहचण्यासाठीही टप्पे आहेत. यातून जात असता तो स्वतःची व इतरांचीही गाऱ्हाणी ईश्वराला ऐकवतो. एक मानसिक आधार मिळवितो पुन्हा जगण्यासाठी.

कुंजविहारीचे जीवनच राष्ट्रासाठी होते. ते सदैव राष्ट्राचाच विचार करीत. त्यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही. 'बार्शीच्या भगवंतास' या कवितेत भारतीयांसाठी भगवंताकडे साकड घातले आहे. संकटातून ईश्वर वाचवतो. म्हणून तो रात्रीचा दिवस करून भगवंताकडे आले आहेत. भगवंताचे चतुर्भूज रूप पाहून शांत वाटले. देशात पारतंत्र्य असल्याने दुःख, दैन्य, दारिद्र्य आहे. तरीही यासर्वांचे निवारण का करत नाही. भगवंता, तुझा, माझा, भूमीचा रंग काळाच आहे. तरी तू भूमीचा कैवार

का घेत नाही. जर कैवार घेतला तर स्वातंत्र्य मिळाले की मी तुलाच वाहतो.

"आर्यभूमितील होवो आमुचा प्रपंच हा सोपा

हवा असू दे संग नको तव वेड लाविशिल बापा" आ.पृ.१७

यातून बार्शीचा भगवंत व कुंजविहारी यांच्यामधील श्रध्देच्या नात्याचा पदर इथे उलगडला आहे.

'सिध्द सिंहासन' या कवितेत सोलापूरचे दैवत सिध्देश्वर याचे वर्णन आले आहे. शहरात रखरखीतपणा आहे. सरोवर दर्शन होता आनंद होतो. सिध्देश्वराने प्रभूकृपेचा स्वयंशुध्द दीप लावला आहे. हे शहर तू निर्मिले तूच इथे नसत तर या शहराला महत्त्व काहोही नाही. या सरोवरात गुरूदेव शिव योगेश्वर नांदतात. तुझ्या शहराचे नाव गाजू दे शिवशक्ती, गुरूदेव, विठ्ठल, दत्त यांची कृपा या शहरावर आहे. कवी सिध्देश्वराला मागणे मागतात.

"भावगीत संगीत नित्य नव जीवन धनसंपदा

श्री सिध्देश्वरवचन भेटवी परमात्म्याच्या पदा" आ.पृ.७०

शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर अफझलखानास मारले यानंतर तुळजापूर देवीचीच प्रतिष्ठापना गडावर केली. 'प्रतापगडवासिनी' ही विजयाचे प्रतीक आहे. चक्रव्यूहातून मुक्त करणारी अद्‌भूत समरांगणा आहेस म्हणून सकळ जन तुला अभिवादन करतात. कुंजविहारींनी वर्णिलेली व शिवरायाने प्रतिष्ठापना केलेली ही देवी आहे.

'विठ्ठलास' या कवितेत कवी विठ्ठलाला उदयाच्या धर्मसभेला बोलावत आहेत. विठ्ठल व पुंडलिक यांची भक्ती सर्व परिचित आहे. सर्वजन पाप हरावे. म्हणून विठ्ठलाचे चरण स्पर्धा करतात. कवी म्हणतात विठ्ठला प्रीती व भक्तीत व्दैत का निर्माण केले? तू सगळीकडे आहे. मग संसारात का नाही. भक्तीसाठी संसारावर तिलांजली द्यावी लागू नये. त्यासाठी तू एकलकोंडा स्वभाव सोडून दे व नवी धर्मगुढी

उभा कर. असे झाले तर कुटुंबवत्सल सुध्दा. आत्मशक्ती जागृत करून भक्त होतील, देव होतील.

'पांडुरंग हरि' या कवितेत पांडुरंगाचे रूप वर्णिलेले आहे. कमरेवर हात ठेवून भवसागर खोल नाही व स्वर्गसुख दोन बोटांवर उरते असे सांगतात.

असा हा हरी लोकांचे रक्षण करतो.

"मुखचंद्रावर हास्यें मनोरम, कुंडलकांती कशी खुले

नव कमळासत्र प्रसन्न प्रेमळ नेत्र शोभती निळे-निळे" आ.पृ.९४

रत्नजडित मुगुट आहे. कोणतीही विशेषणे आवडतात. बासरीच्या मधुर स्वराने गोपी जनांना प्रेम रस अर्पितो असा हा रखुमाईचा प्राणपतीच आहे.

"देई जिवाला सुख सद्‌गती आत्मजागृती धर्ममती

श्री हरिविठ्ठल मंत्ररसायन जन्ममृत्यूभय हरावया" आ.पृ.९४

असाच या परमात्मा, पांडुरंग हरीला हृदयमंदिरात भजूया.

'भावसुमनांजली' ही अनुवादित कविता आहे. मनात भाव असेल तरच काव्य तयार केले जाते. या कवितेत कवी ईश्वरचरणी लीन झाले आहेत. भक्तीमुळे अहंकार गेला. दर्शनही मिळते. देवाची आस लागते. विरह होतो. परमेश्वरापायीच सुख प्राप्त होते. म्हणून तर माझ्या या भावगीताला तू

"म्हण याला वेड गाणे म्हण सूक्त आनंदाचे

सर्व काही तुझ्या हाती समर्पण करायचे।" आ.पृ.११६

असा भाव व्यक्त झाला आहे.

कुंजविहारींची ईश्वरावर भक्ती तर आहेच पण त्याच्यावर प्रेम जडले आहे. ते प्रेम, ती भक्ती या भावगीतातून सहजपणे येते. ती भक्ती कधी विठ्ठलाची, सिध्देश्वराची तर कधी बार्शीच्या भगवंताची, तसेच तुळजाभवानीची. या कवितेतून कर्मकांडावर



HAPUR

नसलेला शुध्द भाव दिसतो. तो भाव भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी ईश्वराकडे मागणी मागतो तशी तीव्र इच्छाही व्यक्त करतो.

## २) आध्यात्मिक गीते

कुंजविहारींची ईश्वरभक्ती भोळी भाबडी नाही तिला अध्यात्माचा आधार आहे. हे कुंजविहारींच्या आध्यात्मिक ज्ञानावरून दिसून येते. ज्याला अध्यात्म समजते तोच शुध्दभाव आचरू शकतो. जीवित कार्यही सत् असते. कवीचा शुध्द भाव त्यांच्या काव्यसंग्रहातील आध्यात्मिक गीतातून दिसतो.

कुंजविहारींची पहिलीच कविता आहे. 'कधी रे अता भेटसी रामराया' वयाच्या २२ व्या वर्षी ऐन तारूण्यात संसारी दुःख झेलत असता, जीवनाला कोणती दिशा नाही, अध्यात्मात प्रगती नाही अशा अवस्थेतून ही कविता प्रगट झाली असावी. "गमे हे मला विश्व निःसार आता मनी बिंबले होसि तू विश्वकर्ता । तुझ्यावाचुनी वाटतो जीव वाया । कधी रे अता भेटसी रामराया" हा देह नव्हे तर काया, वाचा, मन तुझे आहे. म्हणून ईश्वरा तुझ्या गुणांना वर्णिण्याची शक्ती दे. जनाची सेवा घडावी, सतसंग लाभावा, भवाब्धीतून तरण्याची शक्ती दे. मला लवकर भेट ही आर्तता या कवितेतून व्यक्त झाली आहे.

'पंढरीच्या पांडुरंगास' या कवितेत महाराष्ट्राच्या अराध्य दैवताचे गणित सांगतात. अनंताचा अंत जाणणाऱ्या सज्जन तत्त्ववेत्यांनी, मराठ्यांच्या पूर्वजांनी दगडाला देवत्व दिले का? तर -

"विश्व म्हणजे हे गणित निर्गुणाचे
गोड कोडे अति अंतिम उत्तराचे
जन्म मृत्यू बेरीज वजाबाकी

स्वभावाने भागिले निर्गुणाला

ऐक्य-प्रचिती आनंद दे मनाला"          आ.पृ.३३

सगुण काय किंवा निर्गुण काय त्याच्या प्रचितीने आनंद हा होणारच. तो साधुसंताच्या प्रेमाचे निधान ज्ञाननिष्ठांचे पूर्ण समाधान, गुणाकाराचे निर्गुण गुणातील असा विठ्ठल आहे.

कुंजविहारीने ईश्वराला त्याचे गीत गाण्याची शक्ती मागितली. 'परमेश्वरास' या कवितेत ती शक्ती मिळाली आहे. पण या क्षेत्रात अजून नवीन असल्याने गाणी लाजतात. हृदयातच ठेवावी तर भिती वाटते. मन गजबजते रिते असे काही नाही. ईश्वरातून सर्व काही देतो पण मन चोरतो हे सर्वज्ञात आहे.

"तू प्रेमळ परमेश्वर

परि म्हणविशि चित्तचोर

मी-मजला मुकल्यावर

कुठला संसार सार"          गीत पृ.१

म्हणून ईश्वरा तू माझ्या डोळ्यात सदैव रहा आणि एक नवी दृष्टी दे.

'श्री समर्थ' या कवितेत कुंजविहारींनी श्री समर्थांना महाराष्ट्र, सद्‌गुरू म्हटले आहे. समर्थ नरजन्मामध्ये 'नारायण' आहेत. तू पूर्वी भगवंत बनून रामराज्याला नाव मिळवून दिले. तुझा संदेश असा आहे की, प्रथम स्वातंत्र्य शांती नंतर परमार्थी विवेक असावा. तुझा हा संदेश भारतीयांच्या हृदयी यावा. हे राम रसायन सर्वांनी प्राशन करावे हीच इच्छा याही कवितेत व्यक्त केली आहे.

कोणतेही क्षेत्र असू दया, कुठेही जा, संसारी असा परंतु गुरूची, गुरूज्ञानाची प्रत्येकाला गरज असते. अध्यात्मामध्ये तर फार महत्व आहे. गुरूशिवाय कोण वाट दाखवेल? 'गुरूजन गौरव' या कवितेत हा महिमा सांगितला आहे.

"विदयामंदिर विद्यार्थ्यांचे विश्व निरंतर नवे

विश्वकुटूंबी शिक्षक दाता दैन्य न त्या साहवे

धन्य गुरू ते अखंड ज्यांनी जनजीवन उजळिले" आ.पृ.६२

कुंजविहारी अध्यात्मात, निरीक्षणात एवढे पुढे गेलेत की, 'उदयाचा देव कसा असावा' हे सांगू लागले. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपण झुंजलो पण स्वातंत्र्यात सुदिनही यायला हवा त्यासाठी एकता, समता, बंधूता ही तत्वे खऱ्या अर्थाने इथे रूजायला हवीत. ती तत्त्वे रूजण्यासाठी सर्वांसाठी एक देव, निधर्मी राज्य असल्याने एक धर्म असायला हवा.

"देव असावा असा ज्याला देव न मानिल कुणी"

'कबीर वचने' ही अनुवादित कविता असली तरी तिच्यात अध्यात्मही आहे म्हणून या विभागात समावेश करता येईल. अनेकांनी देवलीला रंगविल्या परंतु त्या अपूर्णच आहेत. म्हणून कवी म्हणतात - 'जर तुझे ज्ञान झाले नाही तर तुला कोणते नाव देवू. प्रभू प्रभा दिसण्यासाठी सद्‌गुरूच पाहिजे. तोच मार्ग सांगू शकतो. शुध्द भाविकास देव रोज भेटतो. देव जवळच अंतरात्म्यात आहे. सर्व विश्वात आहे. पण तो दिसत नाही. कस्तुरीप्रमाणे जो प्रेमाने बोलावतो त्याला जवळ घेतो दूर मानते. तो दुरावतो.'

"अंतरी बाहेरी प्रकाशते प्रभा । अनुपम शोभा श्रीहरिची

आनंदाच्या डोही पोहती लोचन । झणी न्याहळून नारायणा ।" आ.पृ.९६

ईश्वर अणू-रेणूत आहे पण भ्रांतीमुळे दिसत नाही व त्यामुळे श्रध्दाहिन वाय्फट श्रम करावे लागतात. काचमणी मानणाराला खरे रत्न ओळखता येत नाही. तो दुरावतो. हृषीकेश जवळच आहे. परंतू मध्ये पापाचे पर्वत असतात. जेंव्हा पुण्य येईल तेंव्हाच प्रभु भेटेल.

"असोनी दिसेना कवि हा अनंत । पापाचे पर्वत आड उभे

पुण्याईचे फळ पावेन मी जेंव्हा । प्रभु भेट तेंव्हा याच देही ।" आ.पृ.१६

'तुळशी वृंदावन' या कवितेत एक अभागिनी संध्याकाळी हरीला नमस्कार करते. ती जुनाट वाड्यात एकटीच असते. का? नवी नवरी असतानाच तिला वैधव्य येते. त्यामुळे पोटी संतानही नाही. ती विचार करते. मला अशी अवस्था का आली? ईश्वर चुकला म्हणून की, माझी ईश्वराची आराधना चुकली म्हणून तिला असेही वाटते की, या जगण्यापेक्षा या जीवनावरच तुळशीपत्र ठेवावे. पण तिची पुण्याई फळाला आली. तिला ईश्वराने भेट दिली व म्हणाले, 'तू धर्मशील, कर्मशील, सत्य-शिव-सौंदर्यप्रिय संजीवनी आहेस.'

"दु:ख दुजाचे दूर कराया दु:खित मन जे झटे

तेच पुण्यफळ आत्मसुखाचे स्वरूप ते गोमटे ।" आ.पृ.१९

'दावी रूप डोळा, पांडूरंगा' या कवितेत कवी लिहतात - संताच्या प्रदेशात परवानगी वाचून प्रवेश केला असला तरी जपून पाऊल टाकण्याची खबरदारी घेतली आहे.

आयुष्याचे कोडे पांडूरंगाविण कोण सोडविल. मी कुठून आलो. कुठे जाणार आहे. हे जगाचे जीवन मृत्यूच्या अधीन आहे. संसार सुखाचे स्वरूप असले तरी उदासीनता, दु:ख, दैन्य आहे. यातून समाधान दे. पांडुरंगा तूला भेटण्यासाठी डोळ्याचा देव्हार, वाणीचा नैवेद्य, प्राणाची आरती केली. कशासाठी? तर -

"अंतरीचे गुज एकांती सांगेन

काया कुरवंडीत, चरणावरी" आ.पृ.२०

'कहत कबीरा' ही अनुवादीत कविता आहे. देव व भक्तामध्ये जात, पंत नाही. टाळी सारखे नाते असते. ज्यामुळे भेदभाव नष्ट होतो. देवासाठी शुध्द भाव हवा. आत्मा सर्वात असूनही अविनाशी आहे. ईश्वराची दृष्टी सगळीकडे आहे. देवासाठी अनुभवही

हवा. तो सत्यलोकात राहतो. मुरलीच्या आनंदाने जीव देवाचे मीलन होते. संसारात असूनही निष्काम कर्म घडते. मरणही सुखाचे होते. जीवन प्रवासात निर्गुणासी एकरूप होणे हा लाभ मोठा आहे. हा सर्व ईश्वराचा खेळ पसारा आहे. माझी देवावरीच प्रीती राधेप्रमाणे झाली. मी आता लोकलाज पाळत नाही. वसंताच्या चांदण्यात ईश्वर भक्त एक होऊ.

कुंजविहारींनी आध्यात्मिक कवितेत ईश्वर भक्त यांच्या शुध्द भावाने निर्माण होणाऱ्या नात्याचे वर्णन केले आहे. पण हा मार्ग सुरूवातीला कठिण करू मिळाल्यानंतर आत्मशक्ती जागृत झाल्यानंतर ईश्वराकडे जगण्याचा मार्ग सरळ होतो व ईश्वर भक्ताचे मीलन होते. अंतर्बाह्य आनंदी आनंद होतो.

**ड) अनुवादित कविता -**

'आहुती' 'गीतगुंजारव' या दोन्ही काव्यसंग्रहात लिहिलेल्या अनुवादित कविता या कुंजविहारींनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लिहिलेल्या आहेत. इ.स.१९५१ ते इ.स.१९६३ या कालावधीत लिहिल्या. या अनुवादित कवितेचा विषय राष्ट्रभक्ती, सुराज्याचे स्वप्न अध्यात्म आहे. या कविता अनुवादित असल्या तरी कुंजविहारींनी त्या आपल्या शैलीत मूळ कल्पनेला बाधा न येता सुंदर अनुवादित केल्या आहेत. या अनुवादित कविता इंग्रजी, बंगाली, हिंदी, संस्कृत, कानडी या भाषितेली कवितांचा अनुवाद आहे. कुंजविहारीचे अनेक भाषेवर प्रभुत्व होते. हेच यातून सिध्द होते.

'गारे गुणवंता' श्री लक्ष्मीनारायण साहू यांच्या कवितेचे भाषांतर आहे. पारतंत्र्यात लिहिलेल्या कवितेमुळेच गुणवंत चिरंजीव झाला. विजयी झाला. मातृभूमीच्या दुःखाने कधी तो दुःखी झाला, कधी रडला, कधी लढला, कधी बावरला, विवेकाने कधी माघार घेतो पण त्यातही तुझ्या दृढ निश्चयाचा जळता अंगार आहे. त्याचे हृदय



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

स्वदेशी अभिमानाने रसरसलो व ते अभिमानाचे दु:खाचे गाणे झाले. ते गाणे प्रेरक व उद्धारक होते. त्या गाण्याच्या पडसादाचा नाद झंकारतो आहे. तो झंकार श्रवण करण्याची आतुरता आहे.

या गाण्यांनी अन्यायावर वर्षण्याची प्रेरणा दयावी. यामुळे दोष परिमार्जन झाले तर धन्यवाद. रामराज्य होईल तो स्वातंत्र्याचा शाश्वत आनंद होईल. या आनंदाचा स्पर्शही अनुभवला आहे. तो कायम रहावा.

कवीचे कार्य हे की, लोकांत चैतन्य निर्माण करणे. कशीही परिस्थिती असली तरी लोकांना आनंद देणे, तिथे मी तू पण नसावे. सर्वजण मित्र या नात्याने वागणे. हेच ते हरिदासाचे सूत्र तो सांगतो व तो निरोप घेतो. ही कविता कुंजविहारीवरच साहूने इंग्रजीत लिहून पाठविली होती.

'युगवीर भावना' पंडित जुगल किशोर मुख्तार यांच्या 'मेरी भावना' या प्रसिध्द हिंदी कवितेचा अनुवाद आहे. कोणताही धर्म, धर्मसंस्थापक असो त्यांच्या ठिकाणी साम्यभावना आहे. जे ज्ञानी स्वार्थत्याग आचरणात तेच जगाला उद्धारतात. त्यांचेच आपण आचरण करू. सत्संग, सत्य भाषण परोपकार, शांतता, निर्भयता, सहनशीलता हे आचरू. पर धन-पति-कांता, अहंकार, वैर, खेद हे टाळू -

"जी ज्यापासुनि मिळेल गुण तो, दोष त्या गुनी सेविन मी
मंगल करणी मंगल वाणी, मंगल गाणी नित्य सुखी
परम अहिंसाधर्म तत्व जगि जिकडे तिकडे चोहिकडे
अप्रिय कटु वा कठोर, शब्दही कधी नसावा मुखामधी
म्हणेल कुणि "युगवीर" म्हणुनि जगि, धन्यवाद दया देऊ या ।" आ.पृ.६७,६८

हीच भावना सर्वत्र असावी हीच ईच्छा या कवितेत व्यक्त केली आहे.

'सिध्द सिंहासन' सोलापूरचे ज्ञानेश्वरपूर्व कालीन श्री शिवयोगी सिध्देश्वर

चरित्रातल्या निर्वाण वचनास अनुलक्षून श्री.द.रा.बेंद्रे यांनी कानडीत ही कविता लिहिली तिचा हा भावानुवाद आहे. सोलापूर शहराचे दैवत श्री सिध्देश्०र सुंदर सरोवरात वसले आहे. सिध्देश्वर या शहराला वरद हस्त प्राप्त झाला आहे. त्या भूमीवर विठ्ठल, दत्त, शिवशक्ती यांची कृपा आहे. हा भूमीचा महिमा गाजू दे अशी इच्छा कवी व्यक्त करतात. कितीही विरोध असला तरी विश्वशांतीसाठी पाऊल पुढेच पडू दे. सिध्देश्वर वचनाने परमात्म्याचे भेट घडावी अशी इच्छा व्यक्त करतात.

'पुण्य पावन प्रेरणा' इ.स.१९५६ मध्ये गणराज्यदिनी, पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कविसंमेलन झाले. त्या प्रसंगी कन्नड कवी श्री.बेंद्रे यांनी म्हटलेल्या एका कवितेचा हा भावानुवाद - आर्यभूमीवर प्रत्येक युगात एक नवीन प्रेरणा उदयाला आलेली दिसते. जेंव्हा पृथ्वीवर, आर्यभूमीवर राक्षस मातले तेव्हा तू रक्षण्यासाठी अवतरलास. नंतर शांती, अहिंसा ही तत्त्वे महावीरांनी पाळली. भ्रमांत राहणाऱ्या व खरा धर्म न समजला म्हणून चिद्‌विलास वादाने लोकांच्यातले ज्ञानेशाने ज्ञानाचे दरवाजे उघडले. या युगात गांधीजी सत्याग्रह व्रत घेऊन अव्तरलेस. अहिंसा धर्म पाळला व ''एकत्र या सन्मित्र व्हा' ही सहजीवनाची घोषणा दिली. अशी ही भारतभूमी धन्य आहे. इथे पुण्य अशाच प्रेरणा उदयाला येतात.

'कविकल्पना' आई मुलाला पाजताना जशी या कुशीवरून त्या कुशीवर करते तसे जगज्जनमी जन्ममृत्यूंच्या बाबतीत प्राण्यांना करते. अशी कल्पना रवींद्रनाथांनी एका कवितेत केली असून ती कल्पना येथे घेतली आहे.

'पांडुरंग हरि' श्रीशंकराचार्याच्या 'भजे पांडूरंगम्' या स्तोत्राचे रूपांतर आहे. पुंडलिक ज्याचा भक्त आहे व जिथे क्षेत्र पंढरपूर आहे. अशा पांडुरंगाला भजूया. महालक्ष्मी पतीला नमूया. कंबरेवर हात ठेऊन हा भवसागर खोल नाही असेच विठ्ठल सांगतो व लोकांचे रक्षण करतो. त्याचे रूप कसे आहे? -

"मुखचंद्रावर हास्य मनोरम, कुंडलकांती कशी खुले

नवकमलासम प्रसन्न प्रेमळ, नेत्र शोभती निळे निळे ।" आ.पृ.९४

विठ्ठल देवाचा देव आहे. तो गोकुळामध्ये सर्वांना स्थित्यानंद देतो. विठ्ठल रखमाबाईचा प्राणपती अनादी काळापासून आहे. त्यांच्या कडूनच मोक्ष मिळू शकतो.

"देई जिवाला सुखे सद्गती, आत्मजागृती धर्मगती

श्री हरि विठ्ठल मंत्ररसायन, जन्ममृत्यूभय हरावया

तो परमात्मा पांडुरंग हरि, हृदयमंदिरी भजू तया ।" आ.पृ.९४

'कबीर वचने' इ.स.१९३०-३१ मध्ये कवींनी तुरूंगात काम्रेड ट्राबवाला यांनी केलेला कबीरांच्या कवनांचा अनुवाद पाहिला. त्याचा भावानुवाद नंतर इ.स.१९६३ मध्ये पूर्ण केला. एकूण-१५ वचने या कवितेत आहेत. त्याचा सारांश असा. आनंद विधान देवरायाचे रूप, लीला कितीही लिहिल्या तरी त्या अपूर्णच राहतात. पूर्ण लीला लिहिणारा कुणीही नाही. तुला कोणत्या विशेषणाने संबोधू. आत्मजोत, प्रभुप्रभा फक्त गुरूमुळे ते शक्य आहे. परंतू मार्ग सापडत नाही. ईश्वर भाविकास मात्र भेटतो. देव सर्वव्यापी आहे कुठेही त्रास दिला तर त्याला वेदना होतील. कस्तुरी प्रमाणे देव अंतरी आहे. पण उगीच त्याची शोधाशोध होते. जो प्रेमाने बोलावतो, त्याला जवळ घेतो. दूर मानतो तो दुरावतो. शुध्द तत्त्व व्हावे तेव्हा देव भेटतो. अणू-रेणूत तो आहे पण भ्रांतीमुळे दिसत नाही. ज्याचे काया, वाचा, मन शुध्द त्यालाच देव भेटतो. पापाचे डोंगर मध्ये असतात. म्हणून तो भेटत नाही. जेंव्हा पुण्य येईल तेंव्हा तो भेटेल.

'कहत कबीरा' टागोरांच्या One Hundred Poems of Kabir या प्रख्यात पुस्तकाचा भावानुवाद केला. त्यातले काही उतारे (२, ५७, ८, १५, ४२, ५०, ५३, ५६, ६८, ७३, ७५, ८२, ८८ व ९८) त्याचा सारांश पुढीलप्रमाणे :

देव भक्तामध्ये जात नसतो. ते नाते भेदभावाला नष्ट करते. साधू बनण्याची गरज

नाही. त्यासाठी शुध्द मन व शुध्द वाणी असेल तर तो संसारीही विरक्त होतो. अविनाशी आत्मा कोणतेही रूप घेतले तरी करतोच. निर्मात्याची दृष्टी सगळीकडे आहे. त्यामुळे आम्हासें काहीच कमी नाही. आत्मारामाचा अंत कळत नाही. ग्रंथ, पाणी, दगड यात देव शोधण्यापेक्षा अनुभवाने तो पहावा. आनंद वाढवणारा मुरलीवाला आहे. मुरलीच्या नादाने जीव-देवाचे, चंद्र-चकोरीची भेट होते. निष्काम कर्माने संसारात असूनही ईश्वर प्राप्त होतो. तिथेच साधुत्वाच्या खुणा दिसतात. स्वतंत्र्यतेच्या ध्वजापुढे मुरली ऐकू येते. मन हरपून जाते व मरणही सुखाचे होते. जीवन प्रवासात निर्गुणाशी एकरूप होणे हाच लाभ मोठा आहे. सुखदु:खाच्या पलीकडे गेल्यास जीवज्योती प्रकाशतात. ईश्वराच्या खेळाचाच हा पसारा आहे. तोच आनंदाची गुढी उभारणारा आहे. राधेची प्रीतीच मला आज दिसते. तो माझा झाला आहे. मी लोकलाजेची तमा बाळगत नाही. फाल्गुनी पौर्णिमेत वसंताचे गाणे गाऊन ईश्वर-भक्त आम्ही या चांदण्यात एक होवू.

'भावसुमनांजली' तिरूवन्नमलाई येथील संत रणमहर्षी यांच्या Marital Garland of Letters (तामिळ नाव अक्षरमणिमाला) या कवितेचा भावानुवाद. प्रस्तुत इंग्रजी भाषांतर
'Collected Works of Raman Maharshi' या ऑर्थर ऑस्बोर्न यांच्या पुस्तकात आहे. कोल्हापूरचे श्री.गं.वि.कुलकर्णी यांनी त्या कवितेच मराठी भाषांतर केले आहे. (अक्षरमणि माला, १९६९) या कवितेचा अनुवाद -

ईश्वरचरणी लीन झाल्याने अहंकार गेला त्यामुळे दर्शनाचे सुख प्राप्त झाले. ईश्वराविना जीव कासावीस होतो. विरह अजिबात सहन होत नाही. परमेश्वरापायीच आत्मसुख प्राप्त होते. सत्यरूप एकात्मता आहे. ईश्वराची माझ्यावर कृपादृष्टी असू दे एका क्षणात आनंदी आनंद होईल. निसर्गात बदल करणाऱ्या, सर्वस्व अर्पिणाऱ्या

मागे सर्वांग उजळून टाक. गुंगीचे औषध देवून बुध्दी हिरावतो मग अंतकाळ आला तरी तू का येत नाही. धाव रे धाव आता. हे प्रेमकोडे सोडविण्यासाठी कवी विनवतो. शेवटी तो म्हणतो दिव्य जीवनानंद घेण्यासाठीच मी हया समरात उडी घेतली तेव्हाच सर्व कोडे सुटले ! तुझ्याकडे जीवन अर्पित केले आहे. काय होईल ते होवो. तुझ् याविना गोड घास जात्च नाही.

कुंजविहारींनी अनुवादित कविता केल्या त्या अनेक भाषेतील आहेत. यावरून त्यांची बहुभाषिकता दिसून येते. तसेच जास्त आध्यात्मिक कवितेचा भावानुवाद आहे. यावरून त्यांची वृष्टी उत्तरार्धात जास्तच भाविक झालेली दिसते. या कवितेतून खऱ्या आनंदाचा व ईश्वराचा वेद लागल्याने दिसून येते.

**समारोप -**

कुंजविहारींच्या अंतरंगाच्या विभागात विविधता आहे. राष्ट्रीय कविता सामाजिक कविता, आध्यात्मिक कविता, अनुवादित काव्य, वाड्.मयविषयक कविता असे मुख्य विभाग आहेत. राष्ट्रीय कवितांच्या विभागामध्येही विविध छटा दिसतात. कुंजविहारींच्या राष्ट्रीय कवितेमधील राष्ट्रभक्ती एकनिष्ठ तर आहेच पण ती डोळस आहे. म्हणूनच तिच्या वाचनाने, श्रवणाने वाचक, श्रोते आत्मजागृत होऊन कृती प्रवण बनतात, मातृभूमीचे प्रेम इतके अगाध आहे की, मातृभूमीसाठी जन्मोजन्मी मरण आले तरी चालेल पण या मातृभक्ताला हिंदभूमीवरच जन्म घ्यायचा आहे. तर पारतंत्र्याची चीड देशवासीयांना ब्रिटीशांच्या विरूध्द लढायला उदयुक्त करतात ते आत्माहुतीची भावना स्वातंत्र्य समर कुंडात स्व-आहुती द्यायला सदैव तयार आहे. देशभक्ती होळीप्रमाणे स्वत:ला अग्नीकुंडात झोकून देऊन इतरांनीही त्या प्रकाशाने चैतन्याची प्रेरणा देतात. कुंजविहारींनी क्रांतीच्या कविता लिहिल्या पण या कवितेमध्ये सौम्यता, संयमी भावनाच दिसते. परंतु त्या परिणामकारक आहेत. कुंजविहारींनी

आपल्या काव्यात विभूतीपूजन केवळ गुण, गौरवासाठी नाही तर ती वाचकांच्या, श्रोत्यांच्या मनात स्फुलिंग निर्माण करते.

सामाजिक कविता या वाचकांना विचार करायला भाग पाडतात. या काव्यातही विविधता आहे. सद्य परिस्थितीचे प्रतिबिंब कवितेतून पडलेले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या, कामकऱ्यांच्या खेड्यातील, शहरातील लोकांच्या व्यथा वेदना मांडल्या आहेत. या कविता बरोबरच लोकशाहींचे आदर्श चित्रही कुंजविहारीने रंगविले. काव्य लेखन वाचनातही विविधता आहे. अनेक स्फुट, काव्याचा आपल्या राष्ट्रीय भावनेच्या अभिव्यक्तीसाठी उपयोग केला आहे. स्तवन, भूपाळी, आरती, गोंधळ यांचा अभिव्यक्तीसाठी उपयोग केला आहे. शृंगारिक काव्यातूनही सुंदर वीरांगणाची राष्ट्रभक्ती चित्रित केली आहे.

वाड्.मयविषयक काव्यातून वाड्.मयाचे प्रेम तसेच, कवी, कविता व कविकल्पना यांचा महिमा गायला आहे. आध्यात्मिक क्षेत्रातही कवींनी अनेक तत्त्वांची मांडणी केली आहे. भक्तीपर गीते व अध्यात्मक तत्वांची मांडणीही साध्या भाषेतून केली आहे. अनुवादित काव्य केले. या विभागातील विषयात आध्यात्मिक विषय जास्त हाताळला आहे. यावरून कवीच्या मनातला अध्यात्माचा खोल ठसाही यातून व्यक्त होतो.

अशाप्रकारे कुंजविहारींच्या 'गीत गुंजारव' व 'आहुती' या काव्यातून साध्या सरळ भाषेत काव्यसंग्रहातील विचार सांगितला आहे. काव्यसंग्रहातील कवितेचे अंतरंग असे उलगडत गेले आहे.

**संदर्भ सूची**

१) संपादक श्री.ज.शा.देशपांडे 'आहुती' डॉ.उषा इथापे (एम.ए.पी.एच.डी.) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रस्तावना पृष्ठ. १४